POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२२७ ● मुंबई, शनिवार, २१ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ‘मुंबई स्पिरिट’ की जीवाशी खेळ?

### बंद दरवाज्याच्या धावत्या लोकलला बाहेरून लटकले प्रवासी

**नेमकं काय दिसतंय व्हिडीओत?**

इन्स्टाग्रामवरून शेअर करण्यात आलेल्या या व्हिडीओत काही पुरुष प्रवासी लोकलच्या बाहेरील कडेला जीव धोक्यात घालून लटकताना दिसतात. विशेष म्हणजे, डब्याचे दरवाजे बंद असतानाही हा प्रकार घडताना दिसतो. ही घटना मध्य रेल्वेच्या एका स्थानकावरील असल्याचे सांगितले जात आहे. लोकल सुटू लागल्यानंतर हे प्रवासी बाहेरूनच लटकून राहतात. पुढे डब्याच्या आत असलेले काही प्रवासी दरवाजे उघडून बाहेर लटकणाऱ्यांना आत ओढून घेतानाही दिसतात. गर्दीच्या वेळेत मुंबई लोकलमधील प्रचंड ताण नवा नाही. मात्र, वेळेत पोहोचण्यासाठी प्रवासी कोणत्या टोकाला जात आहेत, हे या दृश्यांतून पुन्हा अधोरेखित झाले आहे.



**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबईची लाइफलाइन मानल्या जाणाऱ्या उपनगरी लोकलमधील धोकादायक प्रवासाचा आणखी एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. बंद दरवाज्यांची लोकल सुरू असतानाही काही प्रवासी बाहेरून लटकत प्रवास करताना या व्हिडीओत दिसत आहेत. त्यामुळे प्रवासी सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, यालाच 'मुंबई स्पिरिट' म्हणायचं का, असा सवालही उपस्थित होत आहे.

**'मुंबई स्पिरिट'वर नवी चर्चा**

हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर सोशल मीडियावर यावर जोरदार चर्चा सुरू झाली आहे. काहींनी अशा प्रकारांना 'मुंबई स्पिरिट' म्हणून गौरवण्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मुंबईकरांची जिद्द, चिकाटी आणि परिस्थितीशी लढण्याची वृत्ती दाखवण्यासाठी हा शब्द वापरला जातो. मात्र, रोजच्या प्रवासासाठी जीव धोक्यात घालणं ही जिद्द नसून व्यवस्थेतील त्रुटींचं चित्र आहे, असे मत अनेकांनी व्यक्त केले.

**सुरक्षा उपायांवरही प्रश्न**

या व्हिडीओचं महत्त्व आणखी वाढण्याचं कारण म्हणजे मध्य रेल्वेकडून शहरातील पहिल्या नॉन-एसी बंद दरवाज्यांच्या लोकल सुरू करण्याची प्रक्रिया सुरू आहे. अलीकडील मुंब्रा दुर्घटनेनंतर प्रवासी सुरक्षा, गर्दी आणि उघड्या दरवाज्यांमधून होणारा धोकादायक प्रवास या मुद्द्यांकडे पुन्हा लक्ष वेधले गेले होते. त्यानंतरच बंद दरवाज्यांच्या यंत्रणेवर भर देण्यात येत आहे.

**व्हायरल व्हिडिओ पाहा**

मात्र, हा व्हिडीओ पाहता एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. गर्दी किंवा वेळेची घाई यामुळे प्रवासीच सुरक्षा नियमांना बगल देत असतील, तर अशा स्वयंचलित यंत्रणांचा अपेक्षित फायदा कितपत होणार?

**फक्त सुविधा पुरेशा ठरणार का?**

मुंबईतील वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता, केवळ पायाभूत सुविधा वाढवून हा प्रश्न सुटणार नाही, हे या घटनेतून स्पष्ट होते. अधिक क्षमतेच्या सेवा, नियमांची कडक अंमलबजावणी आणि प्रवाशांच्या वर्तनात बदल या तिन्ही गोष्टींची एकत्र गरज असल्याचे या व्हिडीओने पुन्हा अधोरेखित केले आहे. वेग, गर्दी आणि वेळेची शर्यत यांच्यामध्ये सुरक्षितता मागे पडू नये, यासाठी आता अधिक ठोस उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

## आयएमडीचा अलर्ट! 48 तास उन्हाळी पाऊस अन् गारपीटीचे

### हवाई वाहतुकीवरही विचित्र बदलांचा परिणाम




**6 राज्यांना आयएमडीचा अलर्ट!**

देश स्तरावरही हवामानात बदल अपेक्षित असून, केंद्रीय हवामानशास्त्र विभाग अर्थात आयएमडीनं दिल्लीसह हरियाणा, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेशचा पश्चिम भाग आणि उत्तराखंडला गारपिटीचा इशारा दिला आहे. इथं 24 ते 48 तासांमध्ये ताशी 40 ते 50 किमी वेगानं वारे वाहणार असून, सोसाट्याचा वारा आणि गारपिटीचा अंदाज आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

प्रचंड उकाड्यानं नागरिकांची होरपळ सुरू झालेली असताना संपूर्ण देशभरात वारं असं काही फिरलं की एकाएकी उन्हाळी पावसानं सर्वांचीच त्रेधातिरपीट उडवली. शेतकऱ्यांना चिंतेत टाकलं आणि अनेकांचेच प्रवासाचे बेत या पावसानं फसले. अशी ही स्थिती पुढील 48 तास कायम राहील असा प्राथमिक अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात येत आहे.

प्राथमिक माहितीनुसार आणखी दोन दिवस राज्यात पावसाचा जोर कायम असेल. सध्या राज्यातील विविध भागांमध्ये सुरू असलेला उन्हाळी पाऊस आणि गारपिटीच्या घटना आणखी 48 तासांसाठी कायम राहण्याचा अंदाज आहे. त्यानंतर मात्र हवामान कोरडं होऊन पुन्हा तापमानात वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

**मुंबई शहरातही अवकाळीची शक्यता**

हवामानातील सातत्यपूर्ण बदलांमुळं राज्यभरात अवकाळी पावसाचा तडाखा बसतोय. हे बदल शुक्रवारीही कायम राहणार असून मराठवाड्यासह विदर्भात काही जिल्ह्यात अवकाळी पावसाची हजेरी असेल असा अंदाज आहे. मुंबईतही शुक्रवारी पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. शहरात प्रामुख्यानं सकाळच्या सत्रात उपनगरांमध्ये पावसाची हजेरी लागण्याची शक्यता असून या बदलामुळे कमाल तापमानात घट झाल्याचं पाहायला मिळतंय. मुंबईत 21 मार्चनंतर हवामानात बदल होऊन पावसाचा जोर ओसरल्यास 22 ते 25 मार्चपर्यंत कमाल तापमानात वाढ होईल असा अदाज आहे.

**का उद्भवली पावसाळी स्थिती?**

मध्य प्रदेशसह नजीकच्या भागांवर चक्राकार वाऱ्याची स्थिती असून, त्यामुळं विदर्भ आणि मराठवाड्यावर कमी दाबाचा पट्टा सक्रिय असल्यानं पावसासाठी पूरक स्थिती निर्माण होत आहे. राज्यात सध्या उष्णतेच्या लाटेची स्थिती नसून, मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यात पुढील 24 तासांमध्ये ताशी 30 ते 40 किमी वेगानं वारे वाहण्याचा अंदाज असूनन काही जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाची हजेरी असेल.

**विमानसेवा विस्कळीत होण्याची शक्यता**

संपूर्ण देशात होणाऱ्या हवामान बदल आणि वाऱ्यांचा वेग पाहता याचा परिणाम हवाई वाहतुकीवर होण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. प्रामुख्यानं दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर दृश्यमानता कमी असून वाऱ्याचा वेग अधिक असल्यानं अनेक उड्डाणांचा मार्ग बदलण्यात आल्याचं वृत्त आहे, तर बरीच विमानं उशिरानं आकाशात झेपावत आहेत. ही स्थिती पाहता विमानसेवा पुरवणाऱ्या कंपन्यांनी प्रवाशांना घरातून प्रवासासाठी निघण्यापूर्वी Flight Status तपासण्याचं आवाहन केलं आहे.

## वसई-विरारमधील ड्रग्ज माफियांवर मोक्का अंतर्गत कारवाई होणार




**■वसई। प्रतिनिधी,**

वसई- विरार शहरातील अमली पदार्थांची वाढती तस्करी, बेकायदा पद्धतीने शहरात वास्तव्यास असणारे नायजेरियन नागरिक आणि पबचालकांकडून केला जाणारा नियमभंग असे विविध प्रश्न आमदार स्नेहा दुबे-पंडित यांनी अधिवेशनात मांडले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या गुन्हेगारांवर मोक्कासह कठोर कारवाई करण्याची घोषणा केली आहे. वसई- विरार शहरात वारंवार कारवाई करूनही दिवसेंदिवस शहरातील गुन्हेगारी वाढत आहे. या गंभीर विषयावर आमदार स्नेहा दुबे पंडित यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. यावेळी त्या म्हणाल्या की, नालासोपारा व वसई परिसरात नायजेरियन नागरिक मोठ्या प्रमाणावर बेकायदा वास्तव्यास आहेत. यापैकी बहुतांश जणांकडे कोणत्याही कायदेशीर नोंदी किंवा करार नसताना ते शहरात बेकायदा पद्धतीने राहत आहेत. तर शहरातील कोळीवाडा, चिंचोटी, पाचूबंदर, टाकीपाडा, प्रगतीनगर, हनुमान नगर ही नायजेरियन नागरिकांची आणि परिणामी अमली पदार्थ तस्करीचा केंद्र ठरू लागली आहेत.त्यामुळे शहरात बेकायदेशीर पद्धतीने राहणाऱ्या नागरिकांवर पोलिसांनी कारवाई करणे गरजेचे आहे. यावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ६८ नायजेरियन नागरिकांचे डिपोर्टेशन पूर्ण झाले असून १२२ नागरिक डिटेन्शन सेंटरमध्ये असल्याची माहिती दिली. तर पोलिसांना तपासणीचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच शहरातील गुन्हेगारी कमी करण्यासाठी सराईत गुन्हेगारांवर मकोका अंतर्गत कारवाई करणार असल्याची आणि पात्र आरोपींना तडीपार करण्याची प्रक्रिया गतीमान करणार असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

## चॉकलेट दिले अन् दुकानातच...

### दुकानदाराने सहा वर्षांच्या चिमुकलीसोबत काय केले?

**■खोपोली। प्रतिनिधी,**

मुली आणि महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आपण वाऱ्यावर सोडून दिला आहे काय असे वाटावे अशी घटना समोर आली आहे. निर्भया प्रकरण जगभर गाजल्यानंतर पोलिस यंत्रणा सतर्क होतील, गुन्हेगारांना आळआल बसेल असे वाटले होते. मात्र तसे काही होताना दिसत नाहीये. जिथे निर्भया प्रकरण घडले त्याच दिल्लीतील ही घटना आहे. एका दुकानदाराने सहा वर्षांच्या चिमुकलीला दुकानातच आपल्या वासनेची शिकार बनवल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. हा दुकानदार पीडितेच्या कुटुंबाशी चांगलाच परिचित होता. धक्कादायक म्हणजे याधीही त्याने चिमुरडीसोबत हा प्रकार केल्याचे समोर आले आहे.

**आईला बसला धक्का**

या धक्कादायक प्रकारामुळे चिमुरडी प्रचंड घाबरली होती, मात्र तिने धीर एकवटून आपल्या आईला घडलेला प्रकार सांगितला. मुलीचे बोलणे ऐकून आईला मोठा धक्का बसला. पीडितेने सांगितले की, आरोपीने यापूर्वीही तिच्यासोबत असेच गैरवर्तन केले होते. घटनेचे गांभीर्य ओळखून पीडितेच्या आईने तात्काळ आपल्या नातेवाईकांना कळवले आणि कुटुंबासह पोलीस ठाणे गाठून मदतीची मागणी केली.

**दुकानातच केले अत्याचार**

पीडित मुलगी आपल्या घराशेजारील शाळेच्या मैदानात लहान बहिणीसोबत खेळत होती. त्याचवेळी तिथे एक दुकान चालवणाऱ्या ओळखीच्या दुकानदाराने तिला बोलण्यात गुंतवून आपल्या दुकानात नेले. दुकानात कोणीही गिऱ्हाईक नसल्याचा फायदा घेत दुकानदाराने चिमुरडीसोबत अश्लील चाळे करत तिला आपल्या वासनेची शिकार बनवले. यानंतर त्याने याबद्दल कोणालाही काही न सांगण्यासाठी मुलीला धमकावून तिची भीती घालवण्याचा प्रयत्न केला.



## पेपर सुरु असताना विद्यार्थिनीसोबत घडला लाजिरवाणा प्रकार

**■नाशिक। प्रतिनिधी,**

नाशिकमध्ये माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली. १३ मार्च रोजी दहावीचा पेपर सुरू असताना एका विद्यार्थीनीसोबत धक्कादायक प्रकार घडला. पेपरच्या शेवटच्या तासात एका विद्यार्थिनीला अचानक मासिक पाळी सुरू झाली. त्यानंतर तिने तातडीने वर्गातील परीक्षकांना याबाबत सांगितलं आणि पॅड लावण्यासाठी बाथरूमला जाण्याची विनंती केली. पण परीक्षारक्षकांनी संतापजनक रिॲक्शन दिली. “पेपर सुरू असताना बाहेर जाऊ देता येत नाही” असे सांगत परिक्षारक्षकांनी परवानगी नाकारली.

या असंवेदनशील निर्णयामुळे त्या विद्याथीर्नीला उर्वरित पेपर तशाच अवस्थेत बसून पूर्ण करावा लागला.पॅड उपलब्ध नसल्याने डाग पडण्याची भीती, मानसिक ताणतणाव यामुळे त्या विद्याथीर्नीला पेपर लिहिण्यास अडथळा निर्माण झाला असावा, अशी चर्चा आहे. नुकतच सर्वोच्च न्यायालयाने मासिक पाळी व्यवस्थापन हा मुलींचा मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट केले आहे.तसेच शाळांमध्ये मोफत सॅनिटरी पॅड उपलब्ध करून देण्याबाबतही महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य सरकारदेखील मासिक पाळी रजेबाबत सकारात्मक विचार करत आहे.

**विद्यार्थिनीच्या नातेवाईकांकडून नाराजी व्यक्त**

या पार्श्वभूमीवर नाशिकमधील ही घटना केवळ एका विद्यार्थिनीची समस्या नसून संपूर्ण व्यवस्थेतील संवेदनशीलतेचा अभाव अधोरेखित करणारी आहे. विशेष म्हणजे, पेपर दरम्यान लघवीसाठी परवानगी दिली जाते,मात्र मासिक पाळीसारख्या नैसर्गिक आणि आवश्यक कारणासाठी परवानगी न मिळणे ही गंभीर बाब मानली जात आहे.

या घटनेनंतर संबंधित विद्यार्थिनीच्या नातेवाईकांनी नाराजी व्यक्त केली असून हा प्रकार शालेय व्यवस्थापन आणि गटशिक्षणाधिकारी यांच्या निर्दशनास आणून देण्याचा सल्ला देण्यात आला आहे. या प्रकरणात कोणाही विरोधात वैयक्तिक तक्रार करण्यात आली नाही. ही एक व्यवस्थात्मक त्रुटी असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.त्यामुळे संबंधित परीक्षकांवर कारवाई करण्यापेक्षा संपूर्ण परीक्षा प्रणाली अधिक संवेदनशील आणि विद्याथीर्केंद्रित करण्याची गरज अधोरेखित होत आहे.

## राज्यात पेट्रोलची दरवाढ... सर्वसामान्यांच्या खिळाला महागाईची झळ



**■खोपोली। प्रतिनिधी,**

जागतिक बाजारात कच्चा तेल्याच्या किंमतीत शुक्रवारी मोठी घसरण दिसून आली. पण देशातील महागनगरातील पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत वाढ दिसून आली. ही दरवाढ किरकोळ असली तरी त्याचा फटका ग्राहकांना बसत आहे. गेल्या चार वर्षांपासून देशातील इंधनाच्या किंमतीत मोठा बदल झालेला नाही. पण आखाती देशातील युद्धाचा मोठा फटका कच्चा तेलाच्या पुरवठ्यावर होत आहे. देशात घरगुती गॅस सिलेंडरच्या किंमती या महिन्यात 60 रुपयांनी वाढल्या. तर त्या पाठोपाठ पेट्रोल-डिझेलच्या किंमती भडकण्याची भीतीही नागरिकांमध्ये आहे. आज पुणे, सोलापूरसह अनेक शहरात पेट्रोलच्या किंमतीत वाढ दिसून आली.

**पॉवर आणि स्पीड पेट्रोल दरात वाढ**

सोलापुरात साध्या पेट्रोलचे दर स्थिर आहेत. मात्र स्पीड पेट्रोलच्या दरात 2 रुपयांची वाढ दिसून आली. सोलापुरातील पेट्रोल पंपावर साधे पेट्रोल आणि डिझेलचे दर स्थिर आहेत. साधे पेट्रोल 104 रुपए तर स्पीड पेट्रोल 111 वरून 113 रुपए झाले. साधं पेट्रोल आणि डिझेलच्या किमती आहेत त्याच आहेत मात्र स्पीड पेट्रोल दोन रुपयांनी वाढले. पुण्यातही अशीच दरवाढ झाली आहे. आमच्याकडे पेट्रोलचा साठा स्थिर आहे कोणताही तुटवडा नाही मात्र काही ग्राहक गर्दी करत असल्याचे पेट्रोलपंप चालकांचे म्हणणे आहे.

**कच्चा तेलाच्या किंमतीत वाढ**

आखाती देशात कच्चे तेल गुरूवारी 119 डॉलर प्रति बॅरलपेक्षा जवळपास 14 डॉलर प्रति बॅरलने स्वस्त झाले. तर दुसरीकडे अमेरिकन क्रूड डब्ल्यूटीआयचा भाव गुरुवारी 100 डॉलर प्रति बॅरलपेक्षा 8 डॉलर प्रति बॅरलपर्यंत घसरला. युद्ध सुरु असताना भाव घसरल्याने कंपन्यांना मोठा दिलासा मिळाला. इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांचे एक वक्तव्य आले आहे. त्यानुसार, इराण आता कमकुवत झाला आहे. त्याचाकडे युद्ध लढण्यासाठी रसद नाही. त्यामुळे हे युद्ध लवकरच संपणार असा दावा त्यांनी केला होता. तेव्हापासून किंमतींवर परिणाम दिसून येत आहे.

## पुणे-सोलापूर महामार्गावर एसटी बसचा भीषण अपघात, ओव्हरटेकच्या नादात...

**■पुणे। प्रतिनिधी,**

पुणे-सोलापूर महामार्गावर पाटसजवळ एका भीषण अपघाताने प्रवाशांच्या काळजाचा ठोका चुकला. सोलापूरहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या एसटी बसला एका सुसाट कंटेनरने ओव्हरटेक करण्याच्या नादात जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, एसटी बस महामार्गाच्या कडेला जाऊन थेट उलटली. मात्र, या भीषण अपघातात नियतीने साथ दिली आणि बसमधील ४४ प्रवासी मृत्यूच्या दाढेतून सुखरूप बाहेर पडले.

मिळालेल्या माहितीनुसार, सोलापूर-पुणे ही एसटी बस आपल्या मागार्ने जात असताना एका भरधाव कंटेनरने चालकाच्या बाजूने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. यावेळी कंटेनरची एसटीला इतकी जोरात धडक बसली की एसटी चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले. महामार्गावर सध्या रुंदीकरणाचे काम सुरू असल्याने रस्त्याच्या कडेला जाऊन उलटली. बसच्या पुढच्या आणि मागच्या भागाचं मोठं नुकसान झालं आहे.




अपघात होताच प्रवासी किंचाळले घाबरले. बस पलटी झाल्याचे पाहताच जवळच असलेल्या हॉटेलमधील कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. बसच्या खिडक्यांमधून आणि दरवाजातून प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. सुदैवाने, या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. केवळ २ ते ३ प्रवासी किरकोळ जखमी झाले असून, त्यांना प्राथमिक उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे. ४४ जणांचा जीव अगदी थोडक्यात वाचला.

पुणे-सोलापूर महामार्गावर अनेक ठिकाणी कामे सुरू आहेत, ज्यामुळे रस्ता अरुंद झाला आहे. अशातच अवजड वाहनांची ओव्हरटेक करण्याची घाई प्रवाशांच्या जिवावर बेतत आहे. पाटस परिसरात झालेल्या या अपघातामुळे महामार्गावरील वाहतुकीच्या नियोजनाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून कंटेनर चालकावर कारवाईची प्रक्रिया सुरू केली.

## भाईंदरच्या शासकीय रुग्णालयातील अधीक्षक सक्तीच्या रजेवर

**■भाईंदर। प्रतिनिधी,**

भाईंदर पश्चिम येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार घेत असलेल्या एका ८९ वर्षीय वृद्धेचा उंदराने हात कुरतडल्याने तिचा मृत्यू झाला होता. या घटनेने शहरात खळबळ उडाली असून, प्रशासनाने तातडीने कारवाई करत रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. जाफर तडवी यांना 18 मार्चपासून 15 दिवसाच्या सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. तर एका डॉक्टरसह नर्सला निलंबित करण्यात आले आहे. याशिवाय १६ मार्च रोजी सिटीस्कॅन करण्यासाठी आलेल्या मुलीला चुकीच्या पद्धतीने इंजेक्शन दिल्याने हात सुजल्या प्रकरणी सुद्धा तीन जणांवर कारवाई केली आहे.



मिरारोड येथील प्लेझंट पार्क परिसरात राहणाऱ्या सुहासिनी माठेकर (८९) यांना उपचारासाठी 12 मार्च रोजी या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सोमवारी सकाळी 6 च्या सुमारास त्यांचा मुलगा आईला भेटण्यासाठी आयसीयूमध्ये गेला असता, त्याला बेडवरून एक उंदीर पळून जाताना दिसला. बेडशीट रक्ताने माखलेली होती आणि त्यावर उंदराच्या रक्ताळलेल्या पायांचे ठसे उमटले होते. तपासणी केली असता, उंदराने सुहासिनी यांच्या हाताला गंभीररीत्या कुरतडले होते. दुदैर्वाने, सोमवारी सायंकाळी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणाची गंभीर दखल घेत ठाणे जिल्ह्याचे शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांनी रुग्णालयाला भेट देऊन आढावा घेतला. चौकशीअंती वैद्यकीय अधिक्षक डॉ. जाफर तडवी यांना 15 दिवसाच्या सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. तर डॉ. शंतनू कोंडगीर व कंत्राटी परिचारिका नमिता भोनर यांना सेवेतून कार्यमुक्त केले आहे. रुग्णालयाचा अतिरिक्त कार्यभार डॉ. स्मिता आडे यांच्याकडे सोपवण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. सध्या या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली असून, अहवालानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच याबाबत निश्चित माहिती मिळण्यासाठी मृतदेहाचे शवविच्छेदन करून अहवाल मागवण्यात येणार असल्याचे ठाण्याचे सिव्हिल सर्जन कैलास पवार यांनी सांगितले आहे.

**रुग्णालयात सुविधांचा अभाव**

रुग्णालयातील रुग्णवाहिका धक्का मारून चालू करावी लागते. महिला आणि पुरुष स्वच्छतागृह अस्वच्छ आहेत. त्याठिकाणी स्वच्छता होत नाही. स्टोअर रूम मध्ये टेबल, मशिनरी डम्पिंग करून ठेवलेल्या आहेत. तळमजल्यावर ड्रेनेज लाईन जाम होऊन फुटल्याने सर्वत्र मलवहिनी फुटली आहे. त्यामुळे मल पसरला आहे. त्यातून दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे डास आणि झुरळ पण सर्वत्र फिरत आहेत. त्यातून मलेरिया डेंग्यू व हिवताप रोगराई पसरत आहे. तसेच बाजूला नवीन इमारतीच्या बांधकामांमुळे रुग्णालयात धूळ व मातीचे साम्राज्य पसरले आहे. सदरील घटनेनंतर मुख्य जिल्हा शल्य चिकित्सकांमार्फत तसेच स्थानिक प्रशासन व पोलीस विभाग यांच्यामार्फत पाहणी करण्यात आली. त्यावेळी सदरील बाबी रुग्णालयात दिसून आल्या आहेत.

## मुंबई प्रेस क्लबला बॉम्बची धमकी, एका ईमेलमुळे मोठी खळबळ

**■मुंबई। प्रतिनिधी,**

गेल्या काही दिवसापासून धमकीचे सत्र सुरुच असल्याचं पाहायला मिळत आहे. अशातच मुंबईत एक धक्कादायक प्रकार समोर आला असून मुंबई प्रेस क्लबला धमकीचा ईमेल मिळाला आहे. या ईमेलमध्ये क्लबच्या आवारात गॅस बॉम्ब ठेवल्याचा दावा करण्यात आला आहे. गुरुवारी (19 मार्च) सकाळी 7.33 वाजता प्रेस कल्बच्या ईमेलवर स्फोट घडवण्याची धमकी देण्यात आली होती.

या घटनेची माहिती मिळताच, मुंबई पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले. बॉम्ब शोधक आणि




निवारण पथक आणि श्वान पथकाला तैनात करून संपूर्ण परिसरात सखोल तपास मोहीम राबवली जात आहे. सुरक्षेच्या कारणास्तव, कॅम्पसमधील हालचाल मर्यादित ठेवण्यावर लक्ष केंद्रित केले जात आहे. प्राथमिक तपासात असे समोर आले आहे की, हा ईमेल ह्नीरजा अजमल खानह्व या नावाने पाठवण्यात आला होता. पोलिसांनी माहिती दिली की, संबंधित व्यक्तीने ईमेलमध्ये काही अधिकृत दावे केले होते.

दरम्यान, सायबर स्टॉकिंगच्या या घटनेचा तपास सुरू झाला असून प्रोटॉन मेलद्वारे पाठवलेल्या ईमेलचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सध्या कोणताही स्फोटक पदार्थ आढळून आलेला नसला तरी पोलीस अधिक सतर्कता बाळगत आहेत.

## संपादकीय



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# भारताला युद्धाची आर्थिक झळ!



इस्रायल-अमेरिकाविरुद्ध इराण या युद्धामुळे भारताची आर्थिक कोंडी झाली आहे. या युद्धाशी थेट संबंध नसूनही भारताला याची मोठी आर्थिक किंमत मोजावी लागत आहे आणि पुढेही मोजावी लागेल, असे दिसते. भारत आर्थिक महासत्ता बनण्याकडे पाऊल टाकत असतानाच हे संकट आल्याने त्या स्वप्नपूर्तीला मोठा ब्रेक लागण्याची शक्यता आहे. याचे मुख्य कारण म्हणजे जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली भरमसाठ वाढ. इस्रायल आणि अमेरिकेने इराणविरोधात 28 फेब्रुवारी रोजी युद्ध सुरू केले. त्यावेळी कच्च्या तेलाचा भाव प्रति पिंप 73 अमेरिकी डॉलर एवढा होता. युद्धाच्या 19 दिवसांत कच्च्या तेलाच्या दरवाढीने महाविक्रम केला आहे. 19 मार्च रोजी कच्च्या तेलाच्या पिंपाचा दर 160 डॉलरवर पोहोचला आहे. म्हणजेच 19 दिवसांत दुप्पटीहून अधिक दर वाढले आहेत. भारतासाठी ही बाब खूप महत्त्वाची आणि सर्वाधिक चिंतेची आहे. कारण देशात कच्चे तेल मोठ्या प्रमाणात आयात केले जाते. भारताची जेवढी गरज आहे त्यातील तब्बल 88 टक्के कच्चे तेल आयात करावे लागते. यावरून भारत इंधनाबाबत किती परावलंबी आहे, हे लक्षात येते. त्यामुळे भारताची परकीय गंगाजळी (डॉलर) मुख्यत्वे इंधनावर खर्च होते. आधीच रुपयाच्या तुलनेत डॉलर मजबूत आहे. गेल्यावर्षी डॉलरसाठी भारताला 84 ते 85 रुपये मोजावे लागत होते. यंदा डॉलरसाठी 90 ते 91 रुपये मोजावे लागत आहेत. त्यामुळे भारताच्या परकीय गंगाजळीला झळ बसत आहे. अशातच आखाती देशातील युद्धामुळे तिथून होर्णाया इंधन पुरवठ्यात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. तेल वाहून आणणारी भारताची 22 जहाजे होर्मुजच्या सामुद्रधुनीत अडकली आहेत. सध्या भारतात पेट्रोल-डिझेलची टंचाई नाही. मात्र, गॅसची टंचाई निर्माण झाल्याचे दिसत आहे. मुख्यत्वे व्यावसायिक वापरातील गॅसचा तुटवडा झाल्यामुळे हॉटेलसारखे बहुतांश उद्योग गॅसअभावी बंद पडू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या खरेदीसाठी भारताला अव्वाच्या सव्वा रक्कम मोजावी लागेल. गेल्यावर्षीपर्यंत भारत एकूण 88 टक्के कच्चे तेल आयात करत होता. त्यातील 31 टक्के तेल रशियातून आयात करत होता. भारत रशियाला तेलाचे पैसे रुपयामध्ये देत होता. त्यामुळे आपल्या गंगाजळीतील डॉलर सुरक्षित राहात होता. शिवाय रशियातून स्वस्तात कच्चे तेल मिळत होते. मात्र, युद्धामुळे इराणने होर्मुज सामुद्रधुनीचा मार्ग रोखला आहे. भारताने जुना मित्र इराणशी मित्रत्वाचे नाते न राखता इस्रायलशी जवळीक केली. त्यामुळे इराणकडून पूर्वी रुपयाच्या सौद्यात मिळणाऱ्या कच्च्या तेलासाठी डॉलर मोजावे लागत आहेत. शिवाय कच्च्या तेलाच्या किमतीतील वाढ पाहिली तर आणि युद्ध संपेपर्यंत या किमती किती वाढतील हे सांगता येत नसल्यामुळे भारताच्या आर्थिक व्यवस्थेला झटका बसणार आहे. भारताने 2023-24 या आर्थिक वर्षात 231.45 दशलक्ष मेट्रिक टन कच्चे तेल आयात केले होते. तर 2024-25 या आर्थिक वर्षात यात 13 टक्क्यांनी वाढ होऊन आयात 244.5 दशलक्ष मेट्रिक टनांवर पोहोचली होती. 2025-26 या आर्थिक वर्षात एप्रिल 25 ते जानेवारी 26 या कालावधीत भारताने 88.6 टक्के कच्च्या तेलाची आयात केली आहे. जानेवारीपासून आपण अमेरिकेच्या दबावामुळे रशियाच्या ऐवजी अमेरिकेकडून इंधन घेऊ लागलो आहोत. आता युद्धकाळात अमेरिकेने भारताला 30 दिवसांसाठी रशियाकडून कच्चे तेल विकत घेण्याची परवानगी दिली आहे. मात्र, रशियानेही आता प्रिमियम दर आकारायला सुरुवात केला आहे. इराणवर अमेरिकेने वक्रदृष्टी टाकल्यानंतर आणि निर्बंध लादल्यानंतर भारताची इराणकडील आयात कमी होत आता जवळपास शून्यावर आली आहे. म्हणजेच तेलाची गरज भागवण्यासाठी भारताला आता दुप्पटीपेक्षा जास्त पैसा खर्च करावा लागणार आहे. किमान युद्ध संपेपर्यंत किंवा आखाती देशातील स्थिती पूर्ववत होईपर्यंत भारताला हा भार सोसावा लागणार आहे. भारत कच्च्या तेलाचा जगातील मोठा आयातदार असल्यामुळे याची प्रचंड मोठी आर्थिक झळ भारताला बसणार आहे. शिवाय जुना मित्र असलेल्या इराणसोबत आपले पूर्वीसारखे संबंध नसल्यामुळे युद्ध संपल्यानंतरही भारताला इराण तेल विकत देईल का आणि अमेरिका भारताला इराणकडून तेल खरेदी करू देईल का, हे प्रश्न आहेतच. त्यामुळे कच्च्या तेलाची आयात आणि त्यावर होणारा प्रचंड खर्च भारतासाठी डोकेदुखी ठरणार आहे. इथेनॉल उत्पादनामुळे भारताची कच्च्या तेलाची आयात कमी होणार आहे, असे अनेक वर्षांपासून सांगण्यात येते. मात्र, हे चित्र कधी पाहायला मिळेल, हे अजून स्पष्ट नाही. 2027 पर्यंत भारताची अर्थव्यवस्था 5 ट्रिलियन डॉलर (अमेरिकी) करण्याचे भारताचे लक्ष्य आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याचा वारंवार उल्लेख करत असतात. पण आखाती देशातील युद्धाचा भारतावर दूरगामी परिणाम लक्षात घेतला तर भारताचे हे आर्थिक महासत्ता होण्याचे लक्ष्य लांबणीवर पडण्याची शक्यता जास्त आहे. याचा परिणाम देशातील विकासकामांवर आणि रोजगार निर्मितीवर होऊ शकतो, हेही लक्षात घ्यावे लागेल.

# जलहक्काच्या सामाजिक क्रांतीची शंभरी!



महाड येथे १९ मार्च १९२७ रोजी मोठी परिषद आयोजित करण्यात आली. परिषदेनंतर २० मार्च १९२७ रोजी हजारो सत्याग्रहींचा मोर्चा चवदार तळे येथे पोहोचला. तिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तळ्याचे पाणी प्यायले आणि हजारो लोक त्यांच्या मागोमाग पाणी प्यायले. हा क्षण भारतीय सामाजिक इतिहासातील क्रांतिकारी टप्पा ठरला. या घटनेनंतर सवर्ण समाजात संताप उसळला. त्यानंतर तळ्याचे तथाकथित शुद्धीकरण करण्यात आले. या घटनांनी जातिव्यवस्थेच्या अमानुष स्वरूपाचे खरे रूप उघड केले. या घटनेला आज १०० वर्षे झाली आहेत.

भारतीय समाजाच्या इतिहासात काही घटना अशा आहेत ज्या केवळ एखाद्या स्थानिक प्रश्नापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या संपूर्ण सामाजिक व्यवस्थेला आव्हान देर्णाया ठरतात. १९२० च्या दशकात कोकणात घडलेले दासगाव जलहक्क संघर्ष आणि त्यानंतरचा महाड चवदार तळे सत्याग्रह हे भारतीय सामाजिक क्रांतीच्या इतिहासातील असेच दोन निर्णायक टप्पे आहेत. या संघर्षांचे वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ पाण्याच्या हक्कासाठी झालेले आंदोलन नव्हते; ते भारतातील जातिव्यवस्था, सामाजिक गुलामगिरी आणि ब्राह्मणवादी वर्चस्वाविरुद्ध उभे राहिलेले व्यापक आंदोलन होते. या संघषार्ला दिशा देणारे महान नेते होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तर या चळवळीचे संघटन उभे करणारे धाडसी कार्यकर्ते होते आर. बी. मोरे.

डाव्या आणि लोकशाहीवादी विचारसरणीच्या दृष्टीने पाहिले तर दासगाव आणि महाड येथील संघर्ष हे भारतीय समाजातील सामाजिक आणि वर्गीय शोषणाविरुद्धच्या लढ्याचे ऐतिहासिक उदाहरण आहे. भारतीय समाजात हजारो वर्षे टिकून राहिलेली जातिव्यवस्था ही केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक व्यवस्था नव्हती; ती शोषणाची एक संघटित प्रणाली होती. या व्यवस्थेत समाजाचे उच्च आणि नीच स्तरांमध्ये विभाजन करून तथाकथित अस्पृश्य समाजाला मानवी हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले. पाणी, रस्ता, शिक्षण, मंदिरप्रवेश आणि सामाजिक सन्मान या सर्व गोष्टींवर बंदी घालण्यात आली.

महाराष्ट्रातील कोकणपट्ट्यात ही व्यवस्था अत्यंत कठोर स्वरूपात अस्तित्वात होती. गावातील सार्वजनिक जलस्रोत दलित समाजासाठी बंद होते. डाव्या विचारसरणीच्या दृष्टीने पाहिले तर ही व्यवस्था सामाजिक शोषण आणि आर्थिक गुलामगिरी टिकवून ठेवण्याचे साधन होती. कारण ज्याच्या हातात पाणी आणि जमीन यांसारख्या संसाधनांवर नियंत्रण असते, त्याच्याकडे सत्ता असते. १९२३ मध्ये बॉम्बे विधान परिषदेत सी. के. बोले यांनी एक महत्त्वाचा ठराव मांडला. या ठरावानुसार सरकारी किंवा सार्वजनिक निधीतून बांधलेले जलस्रोत सर्व नागरिकांसाठी खुले असावेत. हा ठराव मंजूर झाला, पण प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी झाली नाही. यातून स्पष्ट झाले की कायदे करून सामाजिक अन्याय संपत नाही; त्यासाठी संघर्ष आवश्यक असतो.

**दासगाव संघर्ष :** पहिली ठिणगी झ महाड आंदोलनाच्या आधी कोकणातील दासगाव येथे जलहक्कासाठी संघर्ष उभा राहिला. हा संघर्ष उभारण्यामागे कॉम्रेड आर. बी. मोरे यांचे नेतृत्व अत्यंत महत्त्वाचे होते. मोरे हे कोकणातील दलित चळवळीतील धाडसी आणि प्रखर कार्यकर्ते होते. त्यांनी गावागावात सभा, बैठका आणि प्रचार करून लोकांना संघटित केले. ४ डिसेंबर १९२६ रोजी दासगाव येथे मोठी सभा आयोजित करण्यात आली. या सभेनंतर दलित समाजातील लोकांनी गावातील सार्वजनिक तळ्याचे पाणी पिण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. हा प्रसंग अत्यंत महत्त्वाचा होता. कारण त्या काळात अस्पृश्य समाजाला अशा जलस्रोतांच्या जवळ जाण्याचीही परवानगी नव्हती.

कॉम्रेड मोरे यांचे धाडसी नेतृत्व - कॉम्रेड आर. बी. मोरे यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी आंदोलन उभारण्यापूर्वी सामाजिक जागृतीचे मोठे काम केले. त्यांनी गावात प्रचार करून लोकांना समजावून सांगितले की सार्वजनिक संसाधनांवर सर्वांचा समान हक्क आहे. मोरे यांच्या प्रयत्नांमुळे दासगाव आंदोलन शांततेत पार पडले. या घटनेमुळे दलित समाजात आत्मविश्वास निर्माण झाला आणि कोकणात सामाजिक चळवळीची नवी लाट निर्माण झाली.

महाड परिषद आणि मोठ्या संघर्षाची तयारी - दासगावच्या अनुभवातून मोठ्या प्रमाणावर आंदोलन करण्याची कल्पना पुढे आली. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली महाड येथे परिषद आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या परिषदेसाठी हजारो लोकांना संघटित करण्याचे काम कॉम्रेड आर. बी. मोरे यांनी केले. त्यांनी कोकणातील अनेक गावांमध्ये फिरून लोकांना या आंदोलनात सहभागी होण्यासाठी प्रेरित केले. १९ मार्च १९२७ रोजी महाड येथे मोठी परिषद आयोजित करण्यात आली. परिषदेनंतर २० मार्च १९२७ रोजी हजारो सत्याग्रहींचा मोर्चा चवदार तळे येथे निघाला. तिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तळ्याचे पाणी प्यायले आणि हजारो लोकांनी त्यांच्या मागोमाग पाणी प्यायले. हा क्षण भारतीय सामाजिक इतिहासातील क्रांतिकारी टप्पा ठरला. या घटनेनंतर सवर्ण समाजात संताप उसळला. दलितांनी तळ्याचे पाणी प्यायल्यामुळे ते अपवित्र झाले, असा दावा करण्यात आला. त्यानंतर तळ्याचे तथाकथित शुद्धीकरण करण्यात आले. या घटनांनी जातिव्यवस्थेच्या अमानुष स्वरूपाचे खरे रूप उघड केले.

**मनुस्मृती दहन :** विचारसरणीवर हल्ला-महाड आंदोलनाचा दुसरा टप्पा म्हणजे मनुस्मृती दहन. २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे मनुस्मृती या ग्रंथाचे प्रतीकात्मक दहन करण्यात आले. ही कृती जातिव्यवस्थेला धार्मिक आधार देर्णाया विचारसरणीविरुद्ध उभा केलेला बंडाचा आवाज होता. प्रागतिक विचारसरणीच्या दृष्टीने पाहिले तर दासगाव आणि महाड येथील संघर्ष हे सामाजिक आणि वर्गीय शोषणाविरुद्धच्या लढ्याचे उदाहरण आहे. कारण दलित समाज सामाजिकदृष्ट्या जसा मागास होता, त्याचप्रमाणे आर्थिकदृष्ट्यासुद्धा तो मागास होता. भारतातील सामाजिक विषमता ही केवळ आर्थिक नाही; ती जातीय स्वरूपाची आहे. म्हणूनच कामगार, शेतकरी आणि दलित यांच्या संघषार्ला एकत्र आणणे आवश्यक आहे.

नव्या पिढीतील नेतृत्वाने समाजाला एकत्र आणण्याची गरज आहे. आपापसातील मतभेद बाजूला ठेवून संघटित व्हायला हवे. कारण समाज संघटित नसेल तर त्याची व्यापक प्रगती होत नाही. प्रगतीचे लाभ सगळ्यांपर्यंत पोहोचत नाहीत. सर्वांगीण प्रगती व्हायची असेल तर समाजाने एकत्र असायला हवे. समाजाने एकत्र राहण्यासाठी त्याचे नेतृत्व करर्णाया नेत्यांनी वैयक्तिक महत्वाकांक्षेपेक्षा सामूहिक हिताला प्राधान्य द्यायला हवे. जेव्हा अनेक नेते निर्माण होतात, तेव्हा त्यांची शक्ती एकमेकांना निष्प्रभ करण्यात खर्ची होते. समाजाचा विकास होत नाही. त्यामुळे शिक्षण आणि आर्थिक सुबत्तेमध्ये वाढ होत असताना नव्या नेतृत्वाची वैचारिक व्यापकता वाढण्याची गरज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन ज्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना झाली होती,त्या पक्षाची आज काय अवस्था आहे. त्याचे सुमारे ४० गट झालेले आहे. राजकीय नेत्यांच्या माध्यमातून समाजाची विभागणी होत असते. नेत्यांमध्ये राजकीय महत्वाकांक्षा आणि त्यातून पद आणि आर्थिक संपन्नतेची आकांक्षा असते. पण नेत्यांच्या या राजकीय स्पर्धेतून विविध राजकीय गट जन्माला येतात. समाज विभागला जातो. त्यामुळे समाज म्हणून त्यांची राजकीय ताकद कमी होते. त्यामुळे असे गट आणि त्यांचे नेते मोठ्या पक्षांच्या दावणीला सोयीनुसार बांधले जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळ्यावरील जलप्रशनाची बंदी झुगारून समाजाला मुक्त केले. पण त्याचवेळी त्यांनी जी शिकवण दिली, शिका आणि संघटित व्हा, त्यात मात्र उणीव राहून जात आहे. कारण लोक आज शिकत आहेत, पण संघटित होत नाहीत. याचा नव्या पिढीतील नेत्यांनी विचार करायला हवा आणि संघटित व्हायला हवे.

आज देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षांपेक्षा जास्त काळ होऊनसुध्दा जातीय अत्याचाराच्या घटना घडतात. म्हणूनच दासगाव आणि महाडच्या संघषार्चा संदेश आजही अत्यंत महत्त्वाचा आहे. सामाजिक समता, आर्थिक न्याय आणि लोकशाही मूल्यांसाठी संघर्ष चालू ठेवणे, त्याचबरोबर या आंदोलनापासून प्रेरणा घेऊन दलित व श्रमिक कष्टकरी जनतेने एकजूट करणे व परिवर्तनाच्या चळवळीची धार तीव्र करणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल. महाड चवदार तळे सत्याग्रह आणि त्याआधीचा दासगाव जलहक्क संघर्ष हे भारतीय सामाजिक इतिहासातील क्रांतिकारी टप्पे आहेत. या संघर्षांना दिशा देणारे महान नेते होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तर त्यांची संघटनात्मक उभारणी करणारे प्रखर कार्यकर्ते होते कॉम्रेड आर. बी. मोरे. दासगावची ठिणगी महाडमध्ये ज्वाला बनली आणि त्या ज्वालेने भारतीय समाजातील अन्यायाला दिलेले आव्हान आजही प्रेरणादायी

# एकदाची भरती करा!



राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालये यांमधील प्राध्यापकांच्या रिक्त पदांपैकी सहा हजारांहून अधिक पदे भरण्यास मान्यता दिल्याची उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत सांगितलेली माहिती नवीन नाही. राज्यातील उच्च शिक्षणाच्या संस्थांमध्ये शिक्षकांच्या एकूण रिक्त जागांची संख्या अकरा हजारांहून अधिक आहे.

उच्च शिक्षणसंस्थांच्या राष्ट्रीय क्रमवारीत राज्यातील विद्यापीठांची आणि महाविद्यालयांची होत असलेली घसरण याचेच द्योतक म्हणावे लागेल. ही क्रमवारी जाहीर झाली, की उच्च शिक्षणाच्या दुरवस्थेची चर्चा सुरू होते आणि प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरणार असल्याची घोषणा होते. नंतर फार काही होत नाही. मात्र, आता काही रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे हे खरे. त्याचा तपशील मंत्रिमहोदयांनी विधिमंडळात दिलेला आहे.

राज्यात बाराशेहून अधिक अनुदानित महाविद्यालये असून, त्यांमधील शिक्षकांच्या रिक्त पदांची संख्या जवळ जवळ बारा हजार आहे. त्यांपैकी ५४०० पदे भरली जातील. याशिवाय विद्यापीठांतील प्राध्यापकांच्या रिक्त पदांपैकी सातशे पदे भरली जातील. ही प्रक्रिया कधी संपणार हे स्पष्ट नाही. तातडीने ती भरली जाण्याची शक्यता कमीच. कारण दीर्घ काळानंतर पदभरती होत असल्याने पात्र उमेदवारांची संख्या मोठी असणार. एका पदासाठी शंभर इच्छुक असे प्रमाण असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे अर्ज भरणे, गुणवत्ता यादी, मुलाखती या पारंपरिक प्रक्रियांखेरीज आरोप, प्रत्यारोप, रुसवे-फुगवे, नाराजी आणि 'अर्थ'पूर्ण व्यवहार यांमुळे भरती लांबण्याची शक्यता अधिक.

मुळात रिक्त पदांची संख्या इतकी वाढण्याला सरकारचा उच्च शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कारणीभूत आहे. सरकार कोणत्याही पक्षाचे असले, तरी उच्च शिक्षणाकडे एक ओझे म्हणून पाहिले जात असल्याचा गेल्या २५-३० वर्षांचा अनुभव आहे. याच काळात देशात आणि राज्यात खासगी शिक्षणसंस्थांची भरभराट होत गेली. उत्तम करिअरची संधी देणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांत खासगी महाविद्यालयांना आणि विद्यापीठांना अधिक रस होता; आता तर भाषा आणि मानव्यविद्या शाखांचे 'लिबरल आर्ट्स' असे नामकरण करून ते अभ्यासक्रमही व्यावसायिक शाखांप्रमाणे राबविले जात आहेत. खासगी संस्थांचा असा विस्तार होऊ लागल्यावर खुद्द सरकारमधील मंडळीच सार्वजनिक विद्यापीठांना नाके मुरडू लागली. या विद्यापीठांसाठी आर्थिक तरतूद करताना खळखळ केली जाऊ लागली. परिणामी नवीन भरती जवळपास थांबून रिक्त पदे वाढतच गेली.

सार्वजनिक विद्यापीठांची गुणवत्ता ढासळण्याचे हे एक कारण. अर्थात इतरही कारणे आहेत. प्राध्यापकांचे विषय ज्ञान, अध्यापन कौशल्य, संशोधन आदींचा मुद्दाही आहे. रिक्त जागा न भरल्यामुळे हंगामी पद्धतीने शिक्षक नेमले जाऊ लागले. अन्य पर्याय नसल्याने किंवा कधीतरी कायम होऊ, या आशेने अनेक तरुण-तरुणी अल्प वेतनावर काम करू लागले. दुसरीकडे खासगी संस्थांमध्ये काही मूठभर नावाजलेल्या प्राध्यापकांना आकर्षक वेतन देताना इतरांची मात्र कमी पगारावर बोळवण करण्याची पद्धत सुरू झाली. अनुदानित महाविद्यालयातील पदे भरताना अनेक संस्था 'अर्थ'पूर्ण व्यवहार करतात हे उघड सत्य आहे. प्राध्यापकांच्या एका पदासाठी एक कोटी रुपयांपर्यंत भ्रष्टाचार होत असल्याची कुजबूज आहे. हे लोण आता विद्यापीठांपर्यंत पोहोचल्याचेही सांगितले जाते.

या पार्श्वभूमीवर आता प्राध्यापक भरती होणार आहे. पात्र उमेदवारांना संधी मिळण्यासाठी ही भरती प्रक्रिया पारदर्शकतेने व्हायला हवी. भरतीसाठी ६०-२०-२० हे सूत्र अवलंबणार असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले आहे. शैक्षणिक पात्रतेस ६० गुण आणि अध्यापन कौशल्ये व मुलाखत यांसाठी प्रत्येकी वीस गुण दिले जातील. त्याचबरोबर विद्यापीठांत सर्व विषयांसाठी एकच गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. ही पद्धत अधिक काटेकोर आणि पारदर्शक होण्यासाठी तज्ज्ञांची मदत घ्यायला हवी. विषयज्ञान, अध्यापन कौशल्ये आणि संशोधन या तिन्ही बाबींत उत्तम असलेले उमेदवार निवडले जातील हे पाहायला हवे. खासगी संस्थांचा विस्तार झाला असला, तरी सर्वसामान्यांना अनुदानित महाविद्यालये आणि सरकारी विद्यापीठांखेरीज पर्याय नाही. त्यामुळे त्यांची जबाबदारी घेतानाच तेथील गुणवत्ता उंचावण्यासाठी सरकारने कटिबद्धता दाखवावी आणि त्याची सुरुवात प्राध्यापक भरती प्रक्रिया वेगवान करून व्हावी.

# लोकशाहीच्या मातृसंस्थेची परवड का?



आपण लोकांसाठी लढतो की स्वतःचा अहंगंड कुरवाळण्यासाठी लोकांना वापरतो याचे भान राहिले तर लोकशाहीतले स्थानही राहील. अन्यथा भविष्यात काय वाढून ठेवलेय याचा नेमका अंदाज बांधता येत नाही.

विधानसभा आणि विधान परिषद ही दोन सभागृहे आणि त्याचा प्रशासकीय डोलारा असलेली इमारत याचा समुच्चय विधान भवन या वास्तूत आहे. अधिवेशन कालावधीत या वास्तूत लोकभावना आणि सरकारपक्ष यांचे द्वंद्व रंगते. प्रत्येक विषयावर साधक-बाधक चर्चा करून शक्यतो सहमती अन्यथा बहुमताचा कौल यानुसार निर्णय होऊन कायद्याद्वारे स्थापित झालेले लोकशाही राज्य चालले पाहिजे असे अभिप्रेत असते. पण आता काय सुरू आहे?

सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनावर सुरूवातीपासूनच सावट होते ते अनावश्यक गर्दी टाळण्याचे. गतवर्षी पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी या परिसरात हाणामारीचा प्रसंग दिसला. अनावश्यक गर्दी टाळण्यासाठी सरसकट प्रवेशिका वाटणे बंद झाले. आता या वास्तुत अनावश्यक गर्दी दिसत नाही. विधिमंडळ हा गांभीर्यानेच घेण्याचा विषय असतो.

केवळ हौसेखातर प्रवेशिका मागणारांच्या संख्येत कपात झाली म्हणजे गांभीर्य दिसते असे नव्हे. जर सभागृहात एक मंत्रीच असे म्हणत असतील की त्यांच्या विभागाअंतर्गत एका शासकीय उपक्रमाच्या अधिकाऱ्यांची छायाचित्रे आणि स्कॅन केलेल्या सह्या वापरून बनावट पास तयार केले गेले व ते काही हजारांना गरजवंतांना विकले गेले व त्यात विधान भवनातील कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. मग ही बाब फारच अंतर्मुख करणारी ठरते. ज्या वास्तूने लोकांना नियम व कायदे द्यायचे असतात तिथेच बेकायदा काम होऊ लागले तर सर्वसामान्यांनी त्यातून काय बोध घ्यावा?

प्रतिष्ठा व आदर हा मागून मिळत नसतो तर कमवावा लागतो. विधान भवनाच्या वास्तूबाबत लोकांच्या मनात आदराची भावना असावी अशी अपेक्षा असेल तर ती फक्त कायद्याने व नियमांचा बडगा दाखवून मिळणार नाही. जबरदस्तीने तर नाहीच नाही. संसदीय लोकशाही व्यवस्था असलेल्या देशात श्रेष्ठ कोण आहे तर संसद अथवा विधानमंडळ! इतरांचे क्रमांक नंतर लागतात. कारण त्यांना मिळणारा मानमरताब व मेहनताना याच वास्तूत तयार झालेल्या कायद्याद्वारे मिळत असतो. बाहेर कोणी कितीही मोठे असेल पण या वास्तूत सर्व समान आहेत आणि लोकशाहीच्या मंदिरात प्रवेश करताना विनम्रतेच्या भावनेनेच केला पाहिजे. कारण ते या व्यवस्थेने निर्मिलेले आहेत.

मागे अंदाज समिती धुळे जिल्ह्याच्या दौऱ्यावर गेली असता तेथील शासकीय विश्रामगृहाच्या खोलीत भलीमोठी रक्कम सापडली. राज्यभर त्याची उलटसुलट चर्चा झाली. त्यामुळे विधान भवन सचिवालयाचा एक अधिकारी निलंबित झाला. पुढे विशेष चौकशी पथक स्थापन करण्याची घोषणा झाली. त्याचे काय झाले कोणी विचारलेले नाही. हा विषय मागे पडला असा समज करून घेणे खूप सोपे आहे. पण सामान्य जनता ते सहजासहजी विसरेल असे नाही. त्यांच्या मनात विधिमंडळ समिती व त्यांचे काम याविषयी काय भावना निर्माण झाली असेल ? पण निवडणुका जिंकण्याचे पुस्तकी तंत्र आत्मसात झालेच आहे तर लोक तरी काय करणार आहेत? किंबहुना त्यांच्यासमोर पर्याय तरी काय आहे, असे समाधान करून घ्यायचे असेल तर आनंदच आहे.

नाही म्हणायला नितीमूल्य समिती स्थापन झाली पण त्या समितीने विधिमंडळ सदस्यांसाठी आदर्श आचारसंहिता तयार करण्याचे काम हाती घेतले असेलच असा आशावाद बाळगावा लागतो. एरवीसुद्धा विधिमंडळ सदस्यांचे वर्तन कसे असावे यावर ही समिती काम करणार आहे असे वाटते. पण त्यांना दिलेले काम विधिमंडळ समिती दौऱ्यावर असताना कसे वर्तन असावे यापुरते मर्यादित आहे असे दिसते.

या साऱ्या धबडग्यात विधिमंडळ समित्यांचे दौरे मागे पडले. या दौऱ्यामागची संकल्पना अशी की शासकीय योजना कशा राबविल्या जात आहेत, विकासाची कामे कशी सुरू आहेत. ती ठरल्याप्रमाणे नियमानुसार सुरू आहेत का, लोकांना त्याचा लाभहोतोय का आणि होत नसेल तर काय दुरुस्त्या व्हाव्यात याच्या सूचना करणारा अहवाल विधिमंडळासमोर सादर व्हावा. मागे जुने जाणते सदस्य साहेबराव देशमुख बारडकर यांच्या अध्यक्षतेखालील रोजगार हमी योजना समितीने अत्यंत उत्कृष्ट असा अहवाल ९० च्या दशकाच्या सुरुवातीला सादर केल्याचे आठवते. तसाच एक अहवाल अंदाज समितीने याच दशकात दिला होता ज्यात दक्षिण मुंबईतील गर्दी कशी कमी करता येईल यावर उत्तम विवेचन होते. भुलेश्वर-काळबादेवी परिसरातील काही ठोक बाजार जसे कपडा बाजार ठरल्याप्रमाणे वांद्रे-कुर्ला संकूल वा नवी मुंबईत का स्थलांतरीत झाले नाहीत याची चिकित्सा या अहवालात होती. आजही या परिसरातील अरुंद गल्ल्यांमध्ये जुनाट इमारतींच्या पसाऱ्यात हे बाजार सुरू आहेत व तिथे गर्दी ओसंडून वाहत असते. इथे वाहतूक व्यवस्थेचा विचारच करायला नको.

मूळ प्रश्न असा आहे की लोकशाही राबविणे हे सरकारचे ध्येय असेल तर त्याची चिकित्सा करण्याचा, दुरुस्ती करण्याचा अधिकार विधिमंडळाला आहे. पण अधिवेशन काळात मंत्री उपस्थित नाहीत म्हणून सभागृहांचे काम थांबवावे लागते. गॅलरीत अधिकारी नाहीत म्हणून चर्चा होते. मग आम्ही बोलून काय उपयोग असे सदस्य विचारू लागतात. यातून राज्यात काय संदेश जातो याचा विचारच करायचा नाही? सरकारपेक्षा विधानमंडळ मोठे आहे. त्याचे श्रेष्ठत्व वादातीत आहे ही भावना लोकांमध्ये कायम रहावी असा प्रयत्न करायचा नाही का?

विधिमंडळात विरोधी पक्षाला स्थानच नाही असा घोषा गेले वर्ष-दीडवर्ष सुरू आहे. आता तर दोन्ही सभागृहांना विरोधी पक्षनेताच नाही. आदर्श लोकशाही व्यवस्थेतील संकेतानुसार विरोधी पक्षनेता असावा. तो विरोधी जनमताचा प्रातिनिधीक आवाज असतो. पण संख्याबळ कमी आहे म्हणून हे पद नाकारले जात आहे. हे पद आम्हाला मिळाले पाहिजे असे म्हणत उद्धव ठाकरे पुन्हा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना भेटले. अशी मागणी करण्याची वेळ विरोधकांवर येऊ नये आणि ते टोलविण्याची वेळ सत्तापक्षावर येऊ नये. जे आहे ते जनतेचे आहे आणि आपण प्रातिनिधिक स्वरूपात इथे आहोत ही भावना असेल तर प्रश्न सोपे होतात.

पण विषय वेगळाच आहे. सभागृहातून बाहेर आल्यावर विधान भवनात कुठे बसावे, मिटिंग कुठे घ्यावी, भोजन कुठे घ्यावे ही चिंता शिवसेना- उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार यांच्यापुढे आहे. त्यांना मिळालेली कार्यालये छोट्याशा जागेत चौथ्या मजल्यावर आहेत. तिथे कार्यालयाचा कर्मचारीवर्ग बसतो. विधान परिषदेत अंबादास दानवे विरोधी पक्ष नेते होते तोवर तळमजल्यावरील त्यांच्या दालनात शिवसेनेचे आमदार व अधुनमधून उपस्थिती नोंदवणारे त्यांचे नेते उद्धव ठाकरे बसत. आता दानवे त्या पदावरून गेले अन दालनही गेले. समस्या गंभीर बनलेली दिसते.

एकूण काय, तर २०१९ ला सत्तास्थापनेच्या ज्या घडामोडी घडल्या त्याचे पडसाद वेगवेगळ्या स्वरूपात उमटत असल्याचे दिसते. सुईच्या टोकावर बसेल एवढीही जमीन तुम्हाला मिळणार नाही असे सांगितल्याने महाभारत घडले. अहंकाराचा पराभव करण्यासाठी रामायण घडले. घनघोर संघर्षानंतर आजही हस्तिनापूर आणि लंका आहे तिथेच आहेत. आपण लोकांसाठी लढतो की स्वतःचा अहंगंड कुरवाळण्यासाठी लोकांना वापरतो याचे भान राहिले तर लोकशाहीतले स्थानही राहील. अन्यथा भविष्यात काय वाढून ठेवलेय याचा नेमका अंदाज बांधता येत नाही.

**अंघोळ केल्यानंतर मिळणारा फ्रेशनेस कशातच नाही. दिवसातून किमान एकदा तरी आपण अंघोळ करतो. अंघोळ केल्यानंतर अंग पुसण्यासाठी आपण टॉवेलचा उपयोग करतो. तुम्ही वापरत असलेला टॉवेल तुमचे शरीर पुसण्याचे काम करतो, पण याशिवाय तुमच्या शरीरावरील मळ काढण्यासही मदत करतो. पण जर तुम्ही तुमच्या टॉवेलची योग्य काळजी घेतली नाही तर मात्र हाच टॉवेल तुमच्या त्वचेचा शत्रू बनू शकतो. आज आम्ही तुम्हाला याबद्दल अधिक माहिती देणार आहोत. त्यामुळे तुम्हीही टॉवेल कसाही वापरत असाल तर हे नक्की वाचा.**

# ...तर तुमचा टॉवेल बनू शकतो तुमच्या त्वचेचा शत्रू

**टॉवेलची स्वच्छता**

काही जणांना टॉवेल सतत धुण्याची गरज नसते, असे वाटते. तुम्ही असा विचार करत असाल तर तो अगदीच चुकीचा आहे. कारण तुम्ही अंघोळ केल्यानंतर तुमच्या शरीरावर साचलेला मळ काढला जातो. त्यामुळे साहजिकच तुमचा मळ टॉवेलवर साचतो. अशावेळी जर तुम्ही हा टॉवेल सतत वापरत राहिलात तर तुमच्या त्वचेवरही मळ साचत राहील. त्यामुळे तुम्हाला स्वच्छ करणाऱ्या टॉवेलची स्वच्छताही तितकीच महत्त्वाची आहे. आठवड्यातून किमान दोन वेळा तरी तुमचा टॉवेल धुणे अपेक्षित असते. जर तुमचा टॉवेल पातळ असेल तर तुम्ही तो रोज धुतला तर फारच उत्तम.

**आता आली फेकून देण्याची वेळ**

टॉवेल कितीही चांगला वाटत असला तरी त्याला वापरण्याचीही काहीतरी मर्यादा आहे. तुम्ही वर्षानुवर्षे एकच टॉवेल वापरू शकत नाही. तुम्हाला कालांतराने टॉवेल फेकण्याचीही गरज असते. तुम्ही कॉटन किंवा टर्किश कोणताही टॉवेल वापरत असाल तरीदेखील तुम्ही हा टॉवेल सहा महिन्यांनी काढून टाकायला हवा. जास्तीत जास्त सहा महिने आणि कमीत कमी ३ महिने तुम्ही टॉवेल वापरायला हवा.

**टर्किश की कॉटन टॉवेल**

तुमची त्वचा ही फारच नाजूक असते. कोणतेही कॉस्मेटिक वापरताना तुम्ही अगदी पारखून सगळ्या गोष्टी तपासता. पण मग टॉवेलबाबतीत का नाही? तुम्हाला लवकर वाळणारा टॉवेल हवा असेल तर तुम्ही पंचा किंवा पातळ टॉवेलची निवड करा. जर तुम्हाला मऊ असा टॉवेल हवा असेल तर तुम्ही टर्किश टॉवेलचा वापर करा. आता तुमच्या आवडीवर टॉवेलची निवड अवलंबून आहे.

**सूर्यप्रकाश महत्त्वाचा**

अनेकांना टॉवेल वाळत घालण्याचा कंटाळा असतो. पण तुमच्या टॉवेलसाठी सूर्यप्रकाश महत्त्वाचा असतो. त्यामुळे तुम्ही तुमचा टॉवेल सूर्यप्रकाशात वाळत घालायला हवा. कारण जर त्या टॉवेलवर काही जंतू असतील आणि तुम्हाला टॉवेल धुणे शक्य नसेल अशावेळी कडकडीत उन्हात टॉवेल ठेवल्यामुळे त्यावरील जीवाणू कमी होतात.

**एकट्याने वापरण्याची गरज**

शेअरिंग-केअरिंगमध्ये तुम्ही एकाच टॉवेलचा दोन ते तीन जण वापर करत असाल तर ते तुमच्या त्वचेसाठी फारच वाईट आहे. कारण दोन ते तीन जणांनी एकच टॉवेल वापरला तर तुम्हाला संसर्ग होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे तुम्ही कधीही एकच टॉवेल दोन ते तीन जणांमध्ये वापरू नका. तुम्हाला त्वचा विकार जडण्याची शक्यता यामध्ये अधिक असते. आता तुम्हाला टॉवेल हा अंघोळीपुरता वाटत असला तरी त्याचे महत्त्व काय ते नक्कीच कळलं असेल, त्यामुळे यापुढे याची अधिक खबरदारी घ्या.





# ॲसिडिटीचा त्रास टाळता येईल का?

कामाच्या आणि जेवणाच्याही अनियमित वेळा, धावपळीचे दैनंदिन आयुष्य, बदलती जीवनशैली, जेवणाच्या अनियमित वेळा, जागरण, बदललेले आहाराचे स्वरूप यामुळे अपचन किंवा ॲसिडिटीचा त्रास होणे हा अनेकांच्या दिनक्रमाचाच भाग बनला आहे. आम्लपित्त किंवा हायपर ॲसिडिटी होऊन छातीत जळजळणं हा सध्याच्या धावपळीच्या जीवनात जवळजवळ प्रत्येकाला छळणारा विकार असतो. अनेकदा रुग्ण 'ॲसिडिटी होतेय' हीच तक्रार घेऊन डॉक्टरकडे येतात. पण या तक्रारीत खास ॲसिडिटीचा त्रास आहे की दुसरे काही आहे हे डॉक्टरला शोधून काढावे लागते. आपल्या आजूबाजूच्या अनेकांना हा त्रास होत असतो. छातीतील जळजळ प्रत्येकाने कधी ना कधी तरी अनुभवलेली असतेच असते, तर काही व्यक्तींची ती कायम सोबती असते. आपल्या आजूबाजूला कुटुंबात, शेजारीपाजारी अनेक जण यामुळे त्रस्त असतात. कुणाला जळजळतं, तर कुणाला मळमळतं, कुणाचे यामुळे डोके दुखते तर कुणाचे पोट दुखत असते. कधी खूप ढेकर येतात किंवा तोंडामध्ये कडवटपणा येतो. जळजळ होण्याची अनेक कारणे आहेत. त्यातील प्रमुख कारण म्हणजे ॲसिडिटी किंवा आम्लपित्त. त्यामुळे ॲसिडिटी म्हणजे काय, हा त्रास कुणाला व का होतो, त्यावर इलाज काय, हा त्रास टाळता येईल का, याबद्दल आपण जाणून घेऊ.

**ॲसिडिटी म्हणजे नेमके काय?**

आपल्या पोटात म्हणजे जठरात एक पाचक रस तयार होत असतो. तो ॲसिडिक म्हणजे आम्लयुक्त असतो. आपण जेवलेल्या अन्नाच्या पचनासाठी या पाचक रसाची अत्यंत गरज असते, पण योग्य प्रमाणात. हाच पाचक रस जर जास्त प्रमाणात निर्माण झाला किंवा अवेळी (म्हणजे जेवणाच्या वेळेव्यतिरिक्त) तयार झाला तर आम्लपित्ताचा त्रास होतो. यालाच ॲसिडिटी असे म्हणतात.



# मधुमेहींसाठी उपयुक्त पामर किंवा जांभूळ आंबा



**उन्हाळ्याचे** दिवस हे रसदार, रसाळ आंब्याचे दिवस तर पावसाळ्यात जांभळे खाण्याची मजा काही औरच. ही दोन्ही फळे ज्यांना मनापासून आवडतात त्यांना या दोन्ही फळांची चव एकाच फळात मिळाली तर? होय या दोन्ही फळांची चव एकत्र चाखण्याची संधी आता भारतीयांना साधता येणार आहे. अमेरिकेच्या फ्लोरिडा राज्यात विकसित झालेला जांभूळ आंबा, मूळ नाव पामर मँगो, आता उत्तर प्रदेशात काही ठिकाणी लावला गेला आहे. हा आंबा मधुमेहींसाठी खूपच उपयुक्त असल्याच्या बातम्या व्हायरल झाल्या आहेत.

या जातीचे सगळ्यात पहिले रोप १९२५ साली मियामी येथे लावले गेले होते. २००१ पासून या इंटरनेटवर या विशेष आंब्याची चर्चा होते आहे. ब्राझीलमध्ये या जातीच्या आंब्याचे मोठे उत्पादन घेतले जाते. आता भारतात या जातीच्या आंब्याची लागवड केली जात असल्याचे समजते. सोशल मीडियावर त्यासंदर्भात बातम्या येत आहेत.

या आंब्याचा रंग फिकट जांभळा असून जांभूळ आणि आंबा या दोन झाडांच्या संयोगातून ही जात विकसित गेली आहे असे सांगितले जात आहे. या आंब्याची चव आंबा आणि जांभूळ यांचे मिश्रण आहे.

या आंब्यात अँटीऑक्सिडंट आहेत. याच्या सेवनाने पचन सुधारते, रक्त शुद्ध होते त्यामुळे त्वचा रोग दूर होतात, रक्तशर्करेचे प्रमाण कमी होते, वजन नियंत्रणात येते असे सांगितले जाते. या आंब्याच्या जातीचे एक नाव टोमी एटकिन असे असून यातही दोन वेगळ्या जाती आहेत. अर्थात या आंब्याच्या सेवनाचे जे फायदे सांगितले जात आहेत त्याची पुष्टी केली गेलेली नाही.

## त्वचेच्या संसर्गापासून मुक्ती मिळवण्यासाठी घरगुती उटणे



**साहित्य :**

**एक** वाटी मसूर डाळीचे पीठ, कच्चे तांदूळ एक चतुर्थांश कप, आठ बदाम, अर्धा कप गव्हाचा सांजा, चिमूटभर हळद, गुलाबपाणी

**कृती व वापरण्याची पद्धत**

▮ मसूर डाळ, तांदूळ आणि बदाम बारीक वाटून त्याची पूड तयार करा. ▮ या पावडरमध्ये गव्हाची भरड आणि हळद घाला. ▮ या मिश्रणात पाणी किंवा गुलाबपाणी घालून पेस्ट बनवा. ▮ ही पेस्ट चेहरा, मान आणि हातावर लावा.
▮ वाळल्यावर पाण्याने धुऊन घ्या. ▮ आठवड्यातून एकदा या उटण्याचा वापर करावा.

**हे कसे कार्य करते?**

त्वचेच्या सौंदर्यवर्धनासाठी प्राचीन काळापासून उटण्यांचा वापर केला जात आहे.
हे त्वचेवरील घाण दूर करण्यास मदत करतं. हळदीत आढळणाऱ्या अँटिसेप्टिक गुणधर्मामुळे त्वचेचं संसर्गापासून संरक्षण होतं. बदाम त्वचेचं पोषण करून रंग उजळण्यास मदत करतो.

# नारळाचे तेल : त्वचेसाठी वरदान

**नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात. खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त असते.**

**कित्येक** शतके आपण परंपरेने चालत आलेल्या अनेक घरगुती उपायांचा अवलंब करत आलो आहोत. पण जसजसा काळ बदलला, तसतसे हे उपाय देखील काहीसे बदलत गेले. आपल्या आसपासच्या वातावरणामध्ये सतत वाढती कमान असलेले प्रदूषण, आपली बदलती जीवनशैली, यांच्यामुळे आपले आरोग्य, त्वचा आणि केस यांच्यावर दुष्परिणाम दिसून येऊ लागले आहेत. त्यामुळे आपल्या आरोग्याच्या बदलत्या गरजांनुसार आपण आपल्या केसांच्या, त्वचेच्या आरोग्याकरिता करत असलेल्या उपायांमध्ये देखील बदल करण्याची गरज आहे. यासाठी बाजारामध्ये अनेक तऱ्हेची प्रॉडक्ट्स उपलब्ध आहेत. पण केवळ एका वस्तूने आपण आपली त्वचा, आणि केस यांची उत्तम काळजी घेऊ शकतो, ते म्हणजे नारळाचे किंवा खोबरेल तेल.

▮नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात.

▮खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त आहे. यामुळे त्वचेतील घातक द्रव्ये बाहेर पडण्यास मदत होते.

▮नारळाचे तेल उत्तम मॉईश्चरायझर आहे. सर्व प्रकारच्या त्वचेसाठी नारळाचे तेल गुणकारी आहे. याच्या नियमित वापराने त्वचेवरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते.

▮नारळाच्या तेलाचे गुण आणखी वाढवण्याकरिता त्यामध्ये कापूर घालून हे तेल चेहऱ्याला लावावे व दहा मिनिटे चेहऱ्यावर राहू द्यावे. या कापूरमिश्रित तेलाने त्वचेची निरनिराळी इन्फेक्शन्स दूर होण्यास मदत होते. हे मिश्रण बनवण्यासाठी शंभर ग्रॅम नारळाच्या तेलामध्ये एक कापराची वडी मिसळावी. त्वचेवरील भाजल्याचे वण, टाचांवरील भेगा, त्वचेवर आलेले काळे डाग हटवण्यासाठी कापूर मिश्रित तेल वापरावे.



# व्हेज खिमा रोल

**साहित्य:** सोया ग्रानुल्स- १ वाटी, कांदे- २, टोमॅटो- १, आलं-लसूण-हिरवी मिरची पेस्ट- दीड चमचा, कोथिंबीर चिरून- अर्धी वाटी, लाल तिखट- अर्धा चमचा, हळद- अर्धा चमचा, गरम मसाला- १ चमचा, तेल- २ चमचे, पुदिना चटणी- २ चमचे, चाट मसाला- १ चमचा, मीठ- चवीनुसार, पोळीसाठी- गव्हाचं पीठ- २ वाट्या, तेल- अर्धा चमचा.



**कृती:**

सारणासाठी- सोया ग्रानुल्स ४ वाट्या गरम पाण्यात १५ मिनिटे बुडवून ठेवा. कांदा, टोमॅटो चिरून घ्या. सोया मधील जास्तीचं पाणी पिळून काढून टाका. पॅनमध्ये तेलावर निम्मा कांदा सोनेरी होईपर्यंत परतून घ्या. आलं, लसूण, हिरवी मिरची पेस्ट परतून घ्या. सोया ग्रानुल्स घालून परता. हळद, लाल तिखट, गरम मसाला घाला, परता. टॉमॅटो, मीठ घालून शिजेपर्यंत परता. गॅसवरून उतरवून कोथिंबीर घाला. पोळीसाठी कणिक भिजवून घ्या. १५ मिनिटांनी पोळी लाटून भाजून घ्या. गरम असतानाच व्हेज खिम्याचे मिश्रण, पोळीच्या मधोमध पसरा. चिरलेला कच्चा कांदा, पुदिना चटणी, चाट मसाला घाला. गुंडाळून रोल तयार करा.

# जाणून घ्या हे बदामाचे १० फायदे



▮सकाळी भिजवलेले बदाम खाल्ले तर त्यात औषधी गुणधर्म जास्त असतात. कोरड्या बदामांपेक्षा पाण्यात भिजवून खाल्लेले बदाम जास्त पौष्टिक असतात.

▮बदामांच्या सेवनाने सर्दी आणि पडसे कमी होते. रात्री झोपताना भिजवलेले बदाम आणि गरम दूध घेतले तर सर्दी कमी होते.

▮बदामाने काही काळ भूक भागवली जाते.

▮डाएटिंग करणारे लोक अधिक प्रमाणात बदाम खातात. डाएटिंग करणारे भूक लागल्यास इतर पदार्थांपेक्षा १२ बदाम खातात. हे बारा बदाम एका ब्रेकफास्टचे काम करतात.

▮बदामामुळे पोषक द्रव्ये मिळतात आणि कॅलरीजही वाढत नाहीत.

▮मधुमेह झालेल्या व्यक्तींनी बदाम खाल्ल्यास त्यांची शुगर लेव्हल नियंत्रणात राहते.

▮बदामाची साल कोरडी असल्याने सहसा लोक ती काढून टाकतात. पण ही साल शरीरातील रक्त पातळी वाढवण्यास मदत करते. म्हणून बदाम हे सालासकट खाल्ले पाहिजेत.

▮बदामामध्ये तांब्याचे प्रमाण जास्त असते, जे रक्त शुद्धीकरण करण्यास उपयुक्त ठरते.

▮बदामामुळे कोरड्या त्वचेचा स्निग्धपणा वाढण्यास मदत होते.

▮ बदामाच्या सेवनाने केस गळण्याचे प्रमाणही कमी होते.

# लहान मुलांमधील वाढता लठ्ठपणा ठरतोय नैराश्याचं कारण

**वयाच्या सातव्या वर्षी जर तुमचं मूल लठ्ठ असेल तर ही धोक्याची घंटा आहे. कारण वयाच्या अकराव्या वर्षापर्यंत त्याला नैराश्य गाठू शकतं. लठ्ठ मुलांमध्ये अकारण चिंता तसंच भावनिक असंतुलन यांसारख्या मानसिक समस्या आढळून येत असल्याचं यूकेमधील एका अभ्यासामधून समोर आलं आहे.**

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्य या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या असतात, असं लिव्हरपूल येथील संशोधकांना आढळून आलं आहे. मुलं जशी मोठी होतात, तशा या समस्याही वाढत असल्याचं संशोधनातून समोर आलं आहे.

ज्या मुलींचा BMI (Body Mass Index) आवश्यकतेपेक्षा अधिक असतो, अशा मुलींना मुलांच्या तुलनेत नैराश्य लवकर ग्रासतं. या समस्येमागची नेमकी कारणं काय आहेत, हे शोधण्याचा प्रयत्न मात्र संशोधनातून झाला नाही. लठ्ठपणा आणि मानसिक आजार या दोन्हीमागे दारिद्र्य हा एक घटक असल्याचं मत संशोधनातून मांडण्यात आलं आहे.

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्यावर केलेल्या या संशोधनातले निष्कर्ष हे ग्लास्गोमध्ये होणाऱ्या EuropeanCongress on Obesity मध्ये सादर करण्यात येतील. संशोधकांनी २००० ते २००२ या वर्षांत यूकेमध्ये जन्मलेल्या १७ हजारांहून अधिक मुलांची माहिती गोळा करून त्याचं विश्लेषण केलं. संशोधकांनी गोळा केलेल्या माहितीमध्ये मुलांची उंची आणि वजन यासोबतच त्यांना वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेडसावणाऱ्या भावनिक समस्यांची माहिती घेतली.

वयाच्या तिसऱ्या, पाचव्या, सातव्या, अकराव्या आणि चौदाव्या वर्षी या मुलांचं वर्तन नेमकं कसं होतं, याची माहिती पालकांकडूनच घेण्यात आली होती. सातव्या वर्षापासून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा एकमेकांशी असलेला संबंध उघड व्हायला सुरुवात होते. त्यापूर्वी या दोन्हींमधला संबंध स्पष्टपणे दिसून येत नाही. आमच्या संशोधनातून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा संबंध स्पष्ट झाला, असं लिव्हरपूल युनिव्हर्सिटीमधील मानसशास्त्राचे व्याख्याता डॉ. शार्लेट हार्डमन यांनी स्पष्ट केलं.



लठ्ठपणाच्या समस्येनं ग्रासलेल्या मुलांवर उपचार करणाऱ्यांसाठी ही नवीन माहिती उपयुक्त आहे. 'बऱ्याचदा लोकांना असं वाटतं की कमी खाल्लं आणि अधिक व्यायाम केल्यावर काहीच त्रास होणार नाही. पण हे इतकं सोपं नाहीये.' 'वयाच्या सातव्या वर्षापासून ही मुलं लठ्ठपणा आणि मानसिक आजाराच्या दुष्टचक्रात अडकतात,' असं डॉ. हार्डमन सांगतात. लहान मुलांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येणाऱ्या या समस्या सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. कारण मोठेपणीही आरोग्यावर याचे दुष्परिणाम दिसून येतात.

# 'फार्मा सही दाम' ॲप वापरा आणि स्वस्तात औषधे मिळवा

औषधांच्या वाढत्या बिलांचा तुम्हालाही त्रास होत असेल, तर तुमच्यासाठी ही बातमी दिलासा देणारी आहे. कारण केंद्र सरकारने नुकतेच 'फार्मा सही दाम' नावाचे ॲप लॉंच केले आहे, ज्यामुळे ग्राहकांना ब्रँडेड औषधांप्रमाणे गुणकारी औषधे कमी दरात मिळण्यास मदत होणार आहे. हे ॲप नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटीने विकसित केले असून ते अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही वापरकर्ते वापरू शकतात. ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांना पर्याय उपलब्ध व्हावा, यासाठी हे ॲप सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.

**'फार्मा सही दाम' हे एक असं ॲप, जे ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.**

**ॲप कसे काम करते?**

जर तुमच्या डॉक्टरांनी तुमच्या आजारासाठी ब्रँडेड औषध लिहून दिले असेल तर तुम्ही ॲपच्या मदतीने त्याचा स्वस्त पर्याय शोधू शकता. यासाठी तुम्हाला ॲपमध्ये औषधाचे नाव टाइप करावे लागेल. मग ते तुम्हाला ब्रँडेड औषधांच्या स्वस्त पर्यायांची संपूर्ण यादी दाखवेल, जे तुम्ही कुठूनही खरेदी करू शकता. हे लक्षात ठेवा की, ही औषधे वेगवेगळ्या नावांनी उपलब्ध असू शकतात, परंतु औषधाची क्रिया सारखीच राहील.

या औषधांचे औषधी गुणधर्मही तेच राहतील आणि त्यांची क्रियाही तिच असेल. तर सोप्या भाषेत समजून घेण्याचा प्रयत्न केला तर उदाहरण म्हणून 'ऑगमेंटिन' हे भारतात सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या औषधांपैकी एक आहे. या ब्रँडेड औषधाच्या १० गोळ्यांची किंमत सुमारे २०० रुपये आहे. पण या ॲपमध्ये तुम्हाला या औषधाचे किमान १० पर्याय सापडतील, जे त्यापेक्षा खूपच स्वस्त आहेत. या गोळ्या ८-१० रुपयांना विकत घेता येतील. त्याचप्रमाणे पॅन डीच्या १५ कॅप्सूलची किंमत १९९ रुपये आहे आणि त्याच फॉर्म्युल्यासह दुसऱ्या औषधाच्या १० कॅप्सूल केवळ २२ रुपयांना विकत घेता येतील.

**केंद्र सरकारचा वाटा महत्त्वाचा**

भारतातील औषधांची किंमत ही इतर वस्तूंप्रमाणे मागणी आणि पुरवठा यावर अवलंबून असते. मात्र, ३३ टक्क्यांहून अधिक औषधांच्या किमतींवर सरकारचे नियंत्रण आहे. म्हणजेच या औषधांच्या किमती मनमानी वाढवता येणार नाहीत. नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटी (NPPA) ने अत्यावश्यक औषधांची यादी तयार केली आहे आणि त्यांच्या किमतींवर नियंत्रण ठेवले आहे. ड्रग प्राइस कंट्रोल ऑर्डर (DPCO) अंतर्गत ३५५ औषधांच्या आणि त्यांच्या ८८२ फॉर्म्युलेशनच्या किमती भारतात निश्चित केल्या गेल्या आहेत.

# शरीरासाठी अतिशय घातक आहे साबुदाणा



**हिंदू** धर्मासह इतरही धर्मांत अनेक सण-उत्सव, व्रत-वैकल्ये केली जातात, उपवास ठेवले जातात. यामध्ये एक समान गोष्ट असते ती म्हणजे उपवासाचे पदार्थ. उपवासादरम्यान जवळजवळ सर्व घरांत हमखास वापरण्यात येणारा पदार्थ म्हणजे साबुदाणा. तसाही साबुदाणा पूर्ण वर्षात विविध कारणांनी वापरला जातो, अनेक ठिकाणी साबुदाणा खिचडी, साबुदाणा वडे हे नाश्त्याचे पदार्थ म्हणून त्याला पसंती दिली जाते. मात्र इतक्या मोठ्या प्रमाणात वापरण्यात येणारा साबुदाणा आपल्या शरीरासाठी लाभदायक आहे का, याचा कधी विचार केला आहे?

**साबुदाणा शरीरासाठी आहे अतिशय घातक, तुम्हीच पाहा कारणे –**

▮ साबुदाण्याचा जन्म हा इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाईन्स या देशांत झाला. साबुदाणा हा सागो झाडांपासून कृत्रिमरीत्या तयार केला जातो. यामध्ये कर्बोदकांचे प्रमाण अतिशय जास्त आहे, त्यामुळे वजन वाढण्यासाठी हा कारणीभूत ठरू शकतो.

▮१०० ग्रॅम साबुदाण्यामध्ये मध्ये ९४ ग्रॅम कर्बोदके, ०.२ ग्रॅम प्रथिने, ०.५ ग्रॅम तंतुमय घटक व फक्त १० ग्रॅम कॅल्शिअम असते. यावरून लक्षात येते की शरीरासाठी (वजन वाढवण्याखेरीज) तसा या पदार्थाचा काहीच उपयोग नाही.

▮साबुदाण्यापासून पदार्थ बनवण्यासाठी त्यात जे पदार्थ वापरले जातात, त्यामध्ये बटाटा, शेंगदाणे कुट व इतर काही घटकांचा समावेश असतो. हे घटक पचायला अतिशय जड असतात यामुळे पित्त वाढणे, पोट फुगणे, पोट दुखणे, भूक मंदावणे अशा समस्या उद्भवतात.

▮साबुदाणा आतड्यातील सर्व द्राव शोषून घेत असल्याने आपली मलप्रवृती सुद्धा कठीण होते. तसेच साबुदाण्यामुळे पित्ताचा त्रासही वाढतो.

अशाप्रकारे ज्या दिवशी हलका आणि प्रमाणात आहार घ्यायचा त्याच दिवशी, म्हणजे उपवासाच्या दिवशी आपण साबुदाण्यासारखा जड पदार्थ खाऊन स्वतःच्या शरीराचे नुकसान करून घेत आहोत. त्यामुळे वेळीच सावध व्हा व साबुदाण्याचा जितका हवा तितकाच वापर करा.

# ११ जहाल माओवाद्यांनी केले आत्मसमर्पण

## गडचिरोली पोलीस सीआरपीएफ यांच्या संयुक्त प्रयत्नांना मोठे यश

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक




एकेकाळी माओवाद्यांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यात आता या चळवळीचे अस्तित्व संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. गुरुवार, १९ मार्च रोजी, गडचिरोली पोलीस दल आणि सीआरपीएफ यांच्या संयुक्त प्रयत्नांना मोठे यश आले असून, ११ जहाल माओवाद्यांनी हिंसेचा मार्ग सोडून लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याचा निर्णय घेतला आहे. आत्मसमर्पण केलेल्या या माओवाद्यांवर महाराष्ट्र शासनाने एकूण ६८ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

आत्मसमर्पण केलेल्यांमध्ये अनेक वरिष्ठ कॅडरच्या सदस्यांचा समावेश आहे, ज्यामुळे नक्षलवादी संघटनांच्या कार्यप्रणालीला मोठा तडा गेला आहे. आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांमध्ये सोनी ऊर्फ बाली वत्ते मट्टामीः १६ लाख रुपयांचे बक्षीस (कुतुल दलम), बुदरी ऊर्फ रामबत्ती आयतु मट्टामी (क्षेत्र समिती सचिव): १६ लाख रुपयांचे बक्षीस, सुखलाल बोळगा कोक्सा (कमांडर): ८ लाख रुपयांचे बक्षीस, शांती ऊर्फ सोमरी गंगा तेलामीः ८ लाख रुपयांचे बक्षीस, यमुनक्का ऊर्फ रुखमाक्का पेंदामः ६ लाख रुपयांचे बक्षीस होते.

विशेष म्हणजे, यमुनक्का पेंदाम हिच्यावर २७ गंभीर गुन्हे दाखल असून ती १९८२ पासून चळवळीत सक्रिय होती. याशिवाय गणेश कोवासी, मिनको मट्टामी, धनु वेळंजे, सुनिता होयाम, रमेश मडावी आणि किशोर वासम या सदस्यांनीही शरणागती पत्करली आहे.

गडचिरोली पोलीस दलाच्या प्रभावी मोहिमांमुळे एकेकाळी जिल्ह्यातील १० उपविभागांत पसरलेली ही चळवळ आता केवळ भामरागड उपविभागाच्या सीमावर्ती भागापुरती मर्यादित राहिली आहे. विशेष म्हणजे १५ ऑक्टोबर २०२५ रोजी पोलीत ब्युरो सदस्य, केंद्रीय समिती सदस्य, प्रवक्ता-सिपीआय माओवादी तसेच सचिव-केंद्रीय रिजनल ब्युरो मल्लोजुला वेनुगोपाल राव ऊर्फ भुपती ऊर्फ सोनू याच्यासह एकूण ६१ माओवाद्यांनी ५४ अग्निशस्त्रांसह मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर आत्मसमर्पण केल्यामुळे गडचिरोली आणि संपूर्ण दंडकारण्य विभागातील माओवादी चळवळीला मोठा हादरा बसलेला होता. सन २०२५ पासून आतापर्यंत एकूण १२३ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे, तर आजवरची ही संख्या ७९४ वर पोहोचली आहे.

शासनाच्या आत्मसमर्पण योजनेअंतर्गत या सर्वांना सन्मानाने जगण्यासाठी आर्थिक मदत दिली जाणार आहे. वैयक्तिक मदतः आत्मसमर्पित माओवाद्यांना त्यांच्या पदानुसार ४ ते ८.५ लाख रुपयांपर्यंतचे पुनर्वसन बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. जोडीदारांसाठी अतिरिक्त मदतः सुखलाल कोक्सा-शांती तेलामी आणि गणेश कोवासी-मिनको मट्टामी या पती-पत्नी जोड्यांनी एकत्रित आत्मसमर्पण केल्यामुळे त्यांना अतिरिक्त १.५ लाख रुपयांची मदत मिळेल. गट आत्मसमर्पणः सामूहिकरीत्या शरण आल्यामुळे या गटाला १० लाख रुपयांचे अतिरिक्त बक्षीस दिले जाणार आहे.

ह्लउर्वरित माओवाद्यांनीही हिंसेचा त्याग करून, शस्त्रे खाली ठेवावीत आणि लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात सामील होऊन शांततेचा मार्ग स्वीकारावा.ह्व असे आवाहन विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) संदीप पाटील यांनी केले आहे.

यापूसंगी विशेष पोलीस महानिरीक्षक संदिप पाटील, पोलीस उप-महानिरीक्षक अंकित गोयल, सीआरपीएफचे डीआयजी अजय कुमार शर्मा, पोलीस अधीक्षक नीलोत्पल आणि इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

# संगमनेर तालुक्यात सहावीत शिकणाऱ्या मुलीवर ॲसिड हल्ला करणाऱ्या आरोपीचे रेखाचित्र जारी

संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील इयत्ता सहावी मध्ये शिकणारी ही अल्पवयीन मुलगी शाळा सुटल्यानंतर घराच्या दिशेने आपल्या घरी जात असताना अचानक तिच्या समोर येऊन अज्ञात एक युवकान तिच्या चेहऱ्यावरती ॲसिड फेकलं. मुलीने आरडाओरड केल्यानंतर आसपासचे नागरिक गोळा झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून ॲसिड फेकणाऱ्या तरुणाचा पोलीस शोध घेत आहे. धक्कादायक म्हणजे, दोनच दिवसांपूर्वी संगमनेर तालुक्यातील रणखांब गावात लग्नाला नकार दिल्याने एका मुलीवर प्राणघातक हल्ला केल्याची घटना ताजी असताना तालुक्यात घडलेल्या दुसऱ्या घटनेने एकच खळबळ उडाली.

## पोलिसांनी केलं आवाहन





■संगमनेर। प्रतिनिधी,

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील ॲसिड हल्ला प्रकरणामुळे राज्यभरात खळबळ उडाली आहे. एका सहा वर्षाच्या चिमुरडीवर ॲसिड हल्ला करण्यात आला आहे. पण तीन दिवस उलटूनही आरोपी अद्याप फरार आहे. अखेरीस पोलिसांनी संशयिताचे रेखाचित्र जारी केले आहे. या संशयिताची माहिती देण्याचं आवाहन पोलिसांनी केलं आहे.

संगमनेर तालुक्यातील वडगावपान इथं तीन दिवसांपूर्वी १५ मार्च रोजी शाळेमधील इयत्ता सहावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनीवर अज्ञात तरुणाने ॲसिड हल्ला केला होता. शाळा सुटल्यानंतर घरी जात असताना अज्ञात व्यक्तीने हे कृत्य केलं. त्यानंतर अल्पवयीन मुलीला उपचारासाठी लोणी इथं हलवण्यात आलं आहे.

या घटनेने नातेवाईकांसह गावकरीही धास्तावले असून ही घटना कोणत्या कारणावरून झाले हे अजूनही स्पष्ट झाले नाही. पोलीस आरोपीचा शोध घेत असून मुलीवर लोणी येथील प्रवरा रूग्णालयात दाखल असून उपचार सुरू आहे. मुलीचा चेहरा सात टक्के भाजला आहे. सदर मुलीच्या चेह-यावर ॲसीड फेकणारा तरूण अनोळखी असल्याचं पीडित मुलीचं म्हटलंय.

मुलीच्या घरची गरीब परीस्थिती आहे. शाळेपासून चार किमी अंतरावर हे कुटुंब वस्तीवर राहतात. मुलीला वडिल नाहीत. त्यामुळे मामा त्यांचा सांभाळ करत आहे. या घटनेमुळे कुटुंबीय धास्तावले असून आमच्या मुलीवर हल्ला करणाऱ्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी आई आणि मामाने केली आहे.

दरम्यान, संगमनेर तालुक्यातील वडगावपान इथं सहावीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर ॲसिड हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. हल्ल्यानंतर आरोपी फरार झाला असून मुलीच्या चेहऱ्याच्या उजव्या बाजूला इजा झाली आहे.. जखमी मुलीवर लोणी येथील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असून पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत. या घटनेच्या निषेधार्थ आज वडगावपान ग्रामस्थांनी रास्तारोको आंदोलनाची हाक दिली आहे. मुलीवर आज रूग्णालयात शस्त्रक्रिया पार पडली आहे.

# वसई-विरारमध्ये गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत, प्रशासनाची माहिती



■वसई। प्रतिनिधी,

मध्यपूर्व आशिया, अमेरिका व युरोपमधील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर वसई-विरार शहरातील गॅस सिलिंडर पुरवठ्याचा आढावा घेण्यासाठी महापौर अजीव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी पालिका मुख्यालयात महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत शहरात घरगुती गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती प्रशासनाने दिली. नागरिकांनी अनावश्यक गर्दी टाळावी आणि कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन महापौरांनी केले. तसेच घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर केल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला. दरम्यान, गॅस वितरकांना बुकिंगनंतर वेळेत पुरवठा करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, पाइपलाइन गॅस उपलब्ध असलेल्या ग्राहकांनी सिलिंडरची मागणी करू नये, असेही स्पष्ट करण्यात आले. वितरणादरम्यान सुरक्षेच्या उपाययोजना काटेकोरपणे पाळण्याचे निर्देश देण्यात आले असून, आपत्कालीन परिस्थितीत ११२ क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाने केले. सध्या व्यावसायिक गॅस पुरवठा केवळ १० टक्क्यांपर्यंत मर्यादित असल्याची माहिती देण्यात आली. यामध्ये वाढ करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे महापौरांनी सांगितले. या बैठकीस आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी, प्रांताधिकारी वसई, जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे प्रतिनिधी, गॅस एजन्सी, हॉटेल्स असोसिएशन तसेच पोलीस प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते.

# शताब्दी वर्षात महाडमधील चवदार तळे कात टाकणार... मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत विकासकामांचे भूमीपूजन



■महाड। प्रतिनिधी,

चवदार तळ्याच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मोठी सामाजिक क्रांती घडवून आणली. तो दिवस होता २० मार्च १९२७. बाबासाहेबांनी सार्वजनिक पाणवठ्यावर दलित, शोषितांना पिण्याच्या पाण्याचा हक्क मिळवून दिला. या सामाजिक क्रांतीची नोंद सुवर्णाक्षरांनी झाली. या ऐतिहासिक घटनेला शुक्रवारी (20 मार्च) 99 वर्षे पूर्ण होत असून शताब्दी वर्षाला सुरुवात होत आहे. या निमित्ताने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन करण्यासाठी महाडमध्ये भीमसागर लोटणार आहे.

चवदार तळे सत्याग्रहाच्या 99 वा स्मृतिदिनाचे औचित्य साधून महाडमध्ये विकासकामांच्या भूमिपूजनाचे औचित्य साधण्यात आले आहे. लाखो भीमसैनिकांची उपस्थिती लक्षात घेवून सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, संजय शिरसाट, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, महिला बालकल्याणमंत्री अदिती तटकरे, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर, रिपब्लिकन सेनेचे आनंदराज आंबेडकर आदी नेते उपस्थित राहणार आहेत.

यावेळी चवदार तळ्याच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. या निमित्ताने महाडमध्ये प्रचंड पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या विकासकामांमुळे चवदार तळ्याचा कायापालट होणार आहे. चवदार तळ्याच्या स्मृतीदिनास अभिवादन करण्यासाठी राज्यभरातून लाखो भीम अनुयायी उपस्थित राहणार असल्याने चवदार तळे आणि परिसरात प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 20 मार्च 1927 रोजी चवदार तळे सत्याग्रह करून पिण्याचे पाणी दलित, शोषितांसाठी खुले करून क्रांती केली. या ऐतिहासिक संघर्षाची आठवण म्हणून चवदार तळे क्रांतीस्तंभ परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सुंदर पुतळा उभारण्यात आला आहे. या क्रांतिदिनी बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी दरवर्षी 19 मार्चपासून अनुयायींची गर्दी उसळू लागते. सरकारकडून पिण्याचे पाणी तसेच इतर मुलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या असल्या तरी त्या पुरेशा नसतात. त्यामुळे विविध सामाजिक संस्था पुढाकार घेत अन्नदान, पिण्याच्या पाण्याची सुविधा मोफत उपलब्ध करून देत असतात.



### चवदार तळ्याला होर्डिंगबाजीचा विळखा

या ऐतिहासिक दिनाच्या निमित्ताने केवळ प्रसिद्धीसाठी विविध संघटनांनी फलक लावले आहेत. टेम्पो भरून आणलेल्या फलकांनी शहरातील रस्ते, शासकीय इमारती, चवदारतळे झाकून टाकले आहेत. स्वतःच्या प्रसिद्धीसाठी आंबेडकरी जनतेचे श्रद्धास्थान असलेल्या चवदार तळ्याचा सर्वांना विसर पडल्याचे यंदाही दिसून आले. तळ्याचे सौंदर्य आणि पाण्याला स्पर्श करण्यासाठी येणाऱ्या भीमसागराला या फलकांचे विचित्र दर्शन घडत आहे. गंभीर बाब म्हणजे यात स्थानिक नेतेच पुढे आहेत.

# गर्भवतींना २० व्या आठवड्यात 'ॲनोमली स्कॅन' सक्तीचे!

## बालमृत्यू रोखण्यासाठी सरकारचे महत्त्वाचे पाऊल

■मुंबई। प्रतिनिधी,



जन्मजात विकृतींमुळे होणारे बालमृत्यू कमी करण्यासाठी राज्य सरकारने गर्भवतीसाठी गर्भधारणेच्या १८ ते २० आठवड्यांच्या दरम्यान 'ॲनोमली स्कॅन' सक्तीचे केले आहे. सोनोग्राफीद्वारे जन्मापूर्वी दोषांचे निदान करून वेळेवर वैद्यकीय सुविधा पुरवणे हा सरकारी आदेशाचा हेतू आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आदेशानुसार, राज्यातील सर्व पात्र तसेच उच्च-जोखीम असलेल्या गर्भवती महिलांनी "ॲनोमली स्कॅन" करणे बंधनकारक असेल. गभार्तील संभाव्य विकृतींचा प्रारंभीच शोध घेऊन वैद्यकीय निर्णय घेता यावेत, यासाठी हा निर्णय घेतला आहे. लवकर निदान झाल्यास जन्मजात आजारांशी संबंधित बालमृत्यू कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावता येऊ शकते.

गेल्या काही वर्षात जन्मजात विकृती बालमृत्यूंचे प्रमुख कारण म्हणून समोर आले आहे. २०२३झ्र२४ मध्ये ६.३४ टक्के तर २०२४झ्र२५ मध्ये ६.५९ टक्के बालमृत्यू जन्मजात विकृतीमुळे झाले. ज्यामुळे सार्वजनिक आरोग्य यंत्रणेसाठी ही चिंतेची बाब ठरली आहे.

कामा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. तुषार पालवे यांच्या मते, भारतात दर ४४ नवजात बाळांपैकी जवळपास एक बाळ जन्मजात दोषांनी प्रभावित असते. यात मज्जासंस्था, अस्थि-स्नायू प्रणाली, हृदय, पचनसंस्था तसेच मूत्र प्रणालीशी संबंधित विकृतींचा समावेश होतो. वेळेवर 'ॲनोमली स्कॅन' केल्यास गंभीर विकारांचे लवकर निदान होऊ शकते, ज्यामुळे डॉक्टरांना योग्य समुपदेशन देणे आणि पुढील उपचार किंवा वैद्यकीय निर्णयांसाठी कुटुंबाला मार्गदर्शन करणे शक्य होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

# मॅट्रिमोनियल साईटवरील ओळख महागात पडली

## मॉर्फ अश्लील व्हिडिओने ३६ वर्षीय व्यक्तीला ब्लॅकमेल

■नागपूर। प्रतिनिधी,




नागपूरमधील ३६ वर्षीय इव्हेंट ऑर्गनायझरची मॅट्रिमोनियल साइटवरून फसवणुक केल्याची घटना समोर आली आहे. एका महिलेच्या नावाने बनावट प्रोफाइल तयार करून फसवणूक करणाऱ्याने त्याला जाळ्यात ओढले आणि नंतर मॉर्फ केलेल्या अश्लील व्हिडिओच्या माध्यमातून ब्लॅकमेल केले.

**नेमकं काय घडलं?**

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित व्यक्तीची ओळख एका मॅट्रिमोनियल वेबसाइटवर झाली होती. त्यानंतर व्हॉट्सॲपवर संवाद सुरू झाला. स्वतःला हैदराबादमधील महिला असल्याचे सांगणाऱ्या आरोपीने २ जानेवारी रोजी संपर्क साधला.

सुरुवातीला साधे मेसेज पाठवण्यापासून सुरू झालेला संवाद ८ मार्च रोजी भीषण वळणावर गेला. अवघ्या २७ सेकंदांच्या व्हिडिओ कॉलदरम्यान आरोपीने तक्रारदाराचा फोटो आणि व्हिडिओ रेकॉर्ड केला. त्यानंतर अवघ्या १५ मिनिटांत त्याच्याचा चेहऱ्याचा वापर करून एक मॉर्फ केलेला अश्लील व्हिडिओ तयार करण्यात आला.

**ब्लॅकमेलचा डाव**

यानंतर हा व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत आरोपीने तक्रारदाराकडून पैसे उकळण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे तक्रारदाराला मोठा मानसिक धक्का बसला.

**तपास सुरू**

या प्रकारानंतर पिडीत तरुणाने पोलिसांत धाव घेत तक्रार नोंदवली. या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून, आरोपीचा शोध घेतला जात आहे. डिजिटल पुरावे, व्हॉट्सॲप संपर्क आणि बनावट प्रोफाइलची माहिती तपासली जात आहे.

# ब्लॅकमेलिंगचा थरार! शरीरसुख, पैसे अन् दागिने

## 12 वीत शिकणारी मुलगी कशी अडकली वर्गमित्राच्या जाळ्यात?

■मुंबई। प्रतिनिधी,

एका तरुणानं त्याच्याच वर्गात शिकणाऱ्या तरुणीचा फेसबुक आयडी हॅक करून तिचे मानसिक, शारीरिक आणि आर्थिक शोषण केल्याचा प्रकार समोर आला आहे. आरोपीने विद्यार्थिनीच्या फोटोंमध्ये फेरफार करून तिला ब्लॅकमेल केले आणि तिच्याकडून तब्बल 3 लाख रुपये रोख व 50 लाख रुपयांचे दागिने उकळले.

या प्रकारामुळे पीडित मुलगी इतकी घाबरली होती की तिची प्रकृती खालावली. त्यानंतर हा सर्व प्रकार उघडकीस आला. उत्तर प्रदेशातील आग्रा परिसरातील ही घटना आहे.

**खाण्यातून गुंगीचे औषध आणि शारीरिक शोषण**

पीडित मुलीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीनुसार, पीडिता 12 वीत शिकत असल्यापासून हा प्रकार सुरु आहे. कृष गुप्ता नावाच्या तरुणाने सॉफ्टवेअरच्या मदतीने मुलीचे फोटो मॉर्फ करून तिला धमकावण्यास सुरुवात केली. एप्रिल 2025 पासून पीडितेची प्रकृती खालावू लागली होती, तपासात असे समोर आले की आरोपीने तिला अन्नातून काहीतरी गुंगीचे औषधही दिले होते. यानंतर तिचे शारीरिक शोषण केले. बदनामीच्या भीतीने पीडितेच्या कुटुंबाला सध्या आग्र्याबाहेर स्थलांतर करावे लागले आहे.

**पाच लाख रुपयांची खंडणी**

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन जेव्हा पीडितेच्या वडिलांनी विचारणा केली, तेव्हा आरोपी कृष आणि त्याच्या वडिलांनी चक्क पाच लाख रुपयांची खंडणी मागितली. इतकेच नाही तर आरोपीने पोलीस चौकीत मुलीवरच खोटे आरोप करत तिने आपली दुचाकी चोरल्याचा बनाव रचला. पोलिसांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी दागिने परत करण्याचे आश्वासन देऊन वेळ मारून नेली, मात्र प्रत्यक्षात आरोपींनी पीडितेच्या सोशल मीडियावरून अश्लील पोस्ट करणे सुरूच ठेवले.

### मुख्य आरोपी आणि वडील ताब्यात

या संपूर्ण प्रकरणात आग्रा पोलिसांनी आता ठोस पावले उचलली असून मुख्य आरोपी कृष गुप्ता, त्याचे वडील नीरज गुप्ता आणि अन्य नातेवाईकांविरुद्ध रीतसर गुन्हा दाखल केला आहे. सायबर सेलच्या मदतीने पुराव्यांची जुळवाजुळव केली जात असून, हॅक झालेली फेसबुक आयडी आणि बदनामीसाठी वापरण्यात आलेले डिजिटल रेकॉर्ड्स तपासले जात आहेत. या घटनेने शैक्षणिक वतुर्ळात आणि पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# सोशल मीडियावर मैत्री पडली महागात, तरुणाने सात वर्ष ब्लॅकमेल करत केले अत्याचार... अखेर 'असे' बाहेर आले प्रकरण

■मुंबई। प्रतिनिधी,

सोशल मीडियावरील मैत्री एका 23 वर्षीय तरुणीसाठी गेल्या पाच वर्षांपासून भयानक मानसिक आणि शारीरिक छळाचे कारण ठरल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. इन्स्टाग्रामच्या माध्यमातून 2019 मध्ये पीडितेची ओळख उत्तर प्रदेशातील लोहडरां येथील एका तरुणाशी झाली होती. या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाल्यानंतर, तरुणाने तिला भेटण्यासाठी बोलावले. त्यानंतर बाबा बालक नाथ परिसरात फिरायला नेऊन लग्नाचे आमिष दाखवत तिच्यावर अत्याचार केला आणि त्याच वेळी तिचे काही आक्षेपार्ह फोटो व व्हिडिओ आपल्या कॅमेऱ्यात कैद केले.

**ब्लॅकमेल करण्यास सुरुवात**

या घटनेनंतर संशयित आरोपीने पीडितेला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. तिचे खासगी फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन त्याने तिला वारंवार आपल्याकडे बोलावले. बदनामीच्या भीतीने पीडिता त्याच्याकडे जात राहिली, जिथे तिच्यासोबत मारहाण करून जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले जात होते. हा छळ असह्य झाल्याने पीडितेने यातून सुटका करून घेण्यासाठी 2022 मध्ये खरड येथे भाड्याने फ्लॅट घेतला आणि प्रॉपर्टी डीलिंगचे काम सुरू केले, मात्र तिथेही आरोपीने तिचा पाठलाग सोडला नाही.

**भावनिक कोंडीत पकडून तक्रार मागे**

पीडितेने दिलेल्या माहितीनुसार, तिने यापूवीर्ही विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाद मागण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, प्रत्येक वेळी आरोपीने आत्महत्येचा प्रयत्न करून तिला भावनिक कोंडीत पकडले आणि तक्रार मागे घेण्यास भाग पाडून तडजोड करण्यास प्रवृत्त केले. इतके होऊनही आरोपीची प्रवृत्ती बदलली नाही आणि त्याने अखेर तिचे आक्षेपार्ह फोटो इंटरनेटवर व्हायरल करण्यास सुरुवात केली. यामुळे तरुणीच्या संयमाचा अंत झाला आणि तिने पुन्हा एकदा पोलिसांकडे धाव घेतली.

**आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल**

अखेर पीडित तरुणीने बडसर पोलीस ठाण्यात याप्रकरणी अधिकृत तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी या तक्रारीची गंभीर दखल घेत 17 मार्च रोजी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील कायदेशीर तपास सुरू केला आहे. सोशल मीडियावरील मैत्री कशी जीवघेणी ठरू शकते, याचे हे एक विदारक उदाहरण समोर आले असून या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००० १४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com